९८९०१

# वार्षिक अहवाल २००३ -२००४

# प्रयास

## न्याय व्यवस्थेत सामाजिक कार्य

**टाटा सामाजिक विज्ञान संस्थेचा प्रकल्प**

९/१, बी. डी. डी. चाळ, वरळी, मुंबई - ४०० ०१८.
दूरध्वनी क्र. २४९४ ७१५६, २४९० २२८५
मुंबई सेंट्रल कार्यशाळा. दूरध्वनी क्र. २३०० ५३२९, २३०० ४४२९.
**ई-मेल :** prayas1990@rediffmail.com

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| १. | प्रयास संरचना | १ |
| २. | प्रस्तावना | २ |
| ३. | आभार | ६ |
| ४. | कारागृह विभाग | १५ |
| | • मुंबई मध्यवर्ती कारागृह | |
| | • भायखळा मध्यवर्ती कारागृह | |
| | • ठाणे मध्यवर्ती कारागृह | |
| | • कल्याण जिल्हा कारागृह | |
| ५. | विधी सेवा | २७ |
| ६. | पोलीस ठाणे | ३० |
| ७. | पुनर्वसन | ३२ |
| ८. | शोषित महिला / मुलींचे पुनर्वसन | ३९ |
| ९. | संशोधन आणि माहिती विभाग | ५० |
| १०. | भरुच विभाग (गुजरात) | ५२ |
| ११. | धोरणात्मक कार्य | ५६ |

# १. प्रयास संरचना

कारागृह विभाग
मुंबई सेंट्रल कारागृह
पुरुष विभाग — सुधाकर बाबू,
विजय जोहरे

भायखळा जिल्हा कारागृह
पुरुष विभाग — देवचंद रणदिवे
महिला विभाग — अरुणा आंग्रे
*स्मिता जाधव

कल्याण जिल्हा कारागृह
पुरुष विभाग — मुरलीधर जगताप
महिला विभाग — वर्षा लाड
सलमा नाईक
बंदींची मुले — विशाखा मोरे

ठाणे मध्यवर्ती कारागृह
पुरुष विभाग — सुर्यकांत माने

भरुच कारागृह (गुजरात)
पुरुष विभाग — विठ्ठलभाई सोलंकी
महिला विभाग — वैशाली जायसवाल

न्यायालय आणि कायदेविषयक मदत
राजेश इंगळे

पोलीस ठाणे विभाग
सी. एस. टी. लोहमार्ग पोलीस ठाणे
संगिता गवळी, *विशालक्ष्मी नाथन

भरुच पोलीस ठाणे (गुजरात)
कृपा शाह, पूजा शिरमाली

संरक्षण गृह
बबिता साळवी, *शितल गोडांबे

पाठपुरावा
बबिता साळवी, चंदा जाधव

पुनर्वसन विभाग
पुरुष विभाग — विकास कदम
महिला विभाग — प्रज्ञा शिंदे

शिक्षण, प्रशिक्षण आणि
*शामल गोडांबे, प्रमिला जाधव, वासंती जाधव, चंद्रकांत शिंदे

कला शिक्षिका
*स्मिता जाधव

समुपदेशन
पेनेलॉप टाँग

निवारा आणि तात्काळ सेवा
संगिता मालशे, *ज्योती लोखंडे

कार्यजाळे
चंदा जाधव, संगिता मालशे

अर्थार्जन विभाग
शंकर पोखरकर, सदानंद दळवी

प्रशासकीय विभाग
विजय मोरे, येल्लूबाई नाईक, केसर मकवाना

संशोधन, आणि माहिती संकलन विभाग
टी. एस. देवयानी, शेरॉन मेनेजस, अश्विनी जोतकर, बाजीराव पाटील

धोरण आणि समर्थन विभाग
सिल्विन काळे, शोभा शेलार, चंद्रानी गांगुली, सुनिल म्हस्के

प्रकल्प संचालक
विजय राघवन

प्रकल्प सल्लागार
डॉ. सनोबर सहानी

* हे चिन्ह दर्शविणारे स्वयंसेवक तात्काळ वेद्यकीय सेवा, कला प्रशिक्षण, निवारा पाठपुरावा, साक्षरता शिक्षिका इत्यादी कार्याकरिता मानद स्वयंसेवक म्हणून कार्यरत आहेत.

## २. प्रस्तावना

न्यायव्यवस्थेतील प्रयासच्या कार्याला १ फेब्रुवारी २००४ रोजी १४ वर्षे पूर्ण झाली आहेत. या वर्षी पुनर्वसन प्रक्रियेत अनेक मुलगामी बदल घडवून आणण्याकरिता विविध प्रयत्न करण्यात आले. मागील दोन वर्षांपासून कार्यक्रमांचा आढावा घेऊन काढलेल्या निष्कर्षांचे हे फलितच म्हणावे लागेल. गुन्हेगारी आणि वेश्यावृत्तीमध्ये अडकलेल्या आमच्या अनेक अशीलांचे जीवन पुनर्वसनाव्दारे मार्गी लागावे म्हणून विविध धोरणांची नव्याने आखणी करीत आहोत. त्यानुसार व्यक्तीच्या विभागात जेथे ती राहते तेथे स्थानिक पातळीवरच त्याचे सर्वांगिण पुनर्वसन व्हावे या दृष्टीने नवीन धोरणांमध्ये भर देण्यात आला आहे. सदर धोरणाची आखणी करताना व्यक्तीला कुटुंब किंवा त्याच्या स्थानिक विभागात निर्माण झालेल्या समस्यांना तोंड देत असताना निर्माण झालेल्या कोंडीमुळे ती कोंडी सहन करीत तेथेंच घुसमटलेले जीवन कंठित राहतो. (किंवा व्यक्ती ते घर किंवा विभाग सोडून जातो.)

परिवारापासून विमुक्त झालेल्या व्यक्तीला स्वत:च्या उदरनिर्वाहासाठी, सामाजिक आधार, आर्थिक चणचण आणि समाजात जगण्यासाठी भूमिका किंवा ओळख मिळविण्याकरिता विविध पर्याय शोधावे लागतात. अशा परिस्थितीत ही व्यक्ती एखाद्या असामाजिक घटकाच्या किंवा समाजापासून दुरावलेल्या व्यक्तीच्या संपर्कात येते. अशा व्यक्तीला हे घटक आपल्या जाळयात ओढतात. विविध आमिष दाखवून त्यांच्या गरजाही भागवून वाममार्गाला लावून त्यांचे शोषण करतात. या व्यक्ती पुढे अशा प्रकारच्या बेकायदा व्यवहार अविरत चालविण्याचे माध्यमच बनतात. धोकादायक असलेल्या या गुन्हेगारी वेश्याव्यवसाय, गर्द, जुगार इ. बेकायदा विश्वांमध्ये येणाऱ्या जाणाऱ्या लोकांची संख्या खूप मोठी आहे. त्यामुळे हा व्यवसाय नियमित चालण्याकरिता मोठया प्रमाणावर मनुष्यबळाची आवश्यकता असते. कारण पोलीस कारवाई, कौटुंबिक आणि सामाजिक दडपण, आजारपण, मानसिक ताण, दारु, गर्द सारखी व्यसनाधिनता आणि लहान वयात येणारा मृत्यू यामुळे या व्यवसायातून लोक मोठया प्रमाणावर बाहेर पडत असतात.

अशा परिस्थितीत कुटुंबातील दुसऱ्या व्यक्तीने जर पुढाकार घेऊन या व्यक्तीला बाहेर काढले तर त्याचे पुनर्वसन व समाजामध्ये पुर्नमिलन होणे थोडे सोपे होते. दुर्दैवाने तसे घडताना दिसत नाही. व्यक्ती स्वत: या व्यवसायातून बाहेर निघणे किंवा बाहेर फेकला जाणे हे जेव्हा घडते. तोपर्यंत फारच उशीर झालेला असतो. त्यामुळे त्याचे समाजात किंवा कुटुंबामध्ये येणे फारच कठीण घेऊन जाते. प्रयासने कुटुंबाला समजावून अशा व्यक्तीला पुन्हा परत घेण्यासाठी केलेल्या प्रयत्नाला तात्पुरते यश आले असले तरी ते चिरकाल टिकले नाही. अशा व्यवसायातील व्यक्तींचे निर्गमन वेळीच झाले नाही. तर अशा व्यक्तीचे मानसिक, शारीरिक नैराश्य, सामाजिक दर्जा , नशा आणि आजारपण वाढत जाऊन त्याचे पर्यावसन मृत्यूमध्येच होते.

उपरोक्त परिस्थिती लक्षात घेता त्या व्यक्तीला त्याच्या स्थानिक विभागातून बाहेर काढून नवीन वातावरणात त्याचे पुनर्वसन करण्याचा प्रयत्न करणे आवश्यक आहे. विभागवार पुनर्वसन कार्यक्रमाचा पर्याय मुख्यत्वे दोन बाबींवर अवलंबून आहे. एक म्हणजे व्यक्ती त्याच्या सुटकेनंतर पुन्हा आपल्या जुन्या वातावरणात परत जाऊन पुर्नप्रस्थापित होईल. किंवा त्या व्यक्तीला त्याच्या जुन्या विभागापासून दूर वेगळया वातावरणात पुर्नवसित करण्याकरिता सहाय्य करणे. त्याचप्रमाणे प्रयास एक वेगळा पर्याय शोधत आहे. तो म्हणजे स्वयंसेवी संस्था संघटनांच्या जाळयात या व्यक्तीला समाविष्ठ करुन त्यास पुनर्वसन प्रक्रियेत सहकार्य करणे. हा पर्याय निवडण्याकरिता पुढील मुद्दे लक्षात घेतले आहेत.

- स्वयंसेवी संस्था संघटनांचे वातावरण दुर्लक्षित दुर्बल घटकांकरिता आकर्षित करणारे आहे.
- खाजगी क्षेत्रापेक्षा हे क्षेत्र अधिक ओळखीचे असून सामाजिक कार्यकर्ता देखील या क्षेत्राचेच अविभाज्य घटक आहेत.
- विविध प्रयोग करण्याकरिता हें क्षेत्र खुले असून त्यात लवचिकता आहे.
- येथील वातावरण अशीलांना जवळचे वाटते आणि पुढील संस्था संघटनांचे जाळे म्हणजे त्यांना आपल्या अनौपचारिक वातावरणाचे विस्तारित क्षेत्र वाटते.
- औपचारिक जगाशी जवळचा संबंध असलेल्या या अनौपचारिक स्वयंसेवी वातावरणातून औपचारिक क्षेत्रात जाण्याचा हा एक प्रकारचा साकव वाटतो.
- काही काळ या स्वयंसेवी क्षेत्रात व्यतीत केल्यावर कालांतराने अशील याच वातावरणाचा एक भाग बनून जाण्यात अधिक संधी उपलब्ध होतील अशी आशा वाटते.
- अशीलास समाजाच्या मुख्य प्रवाहात येण्याकरिता स्वत:मध्ये काही बदल घडवून आणण्याकरिता काही वेळ लागतो. तो वेळ या स्वयंसेवी वातावरणात त्यांना मिळू शकतो.
- अशीलाकडे असणारे सामाजिक सकारात्मक कौशल्ये त्यांचे अंगी असलेले सुप्त गुण यांना वाव देण्याकरिता सुरक्षित आणि उत्तेजक वातावरण स्वयंसेवी संस्था संघटनांमध्ये उपलब्ध आहे. त्याचबरोबर कार्य संस्कृतीकरिता आवश्यक असणारे स्वयंशिस्त, सामाजिक कौशल्ये शिकायला मिळतील.
- स्वयंसेवी क्षेत्र हे मोठया प्रमाणावर वाढत असलेले क्षेत्र असून सध्याचे सामाजिक—आर्थिक वास्तव लक्षात घेता एखादी व्यक्ती या क्षेत्रात आपल्या कौशल्यांच्या आधारावर नोकरी मिळवू शकेल.

उपरोक्त चौकट लक्षात घेता पुनर्वसन कार्यक्रमाची पुर्नबांधणी पुढीलप्रमाणे करण्यात आली आहे.

अ) प्राथमिक संपर्क स्थानः

महिला संरक्षण गृह, रेल्वे स्थानक, लालबत्ती विभाग आणि वस्ती पातळीवर काम करणाऱ्या संस्थांच्या ओळखीने येणारे अशील हे प्राथमिक संपर्क स्थाने म्हणून आहेत. प्रामुख्याने येथून गुन्हेगारी किंवा वेश्यावृत्ती मधील अशीलास किंवा अशा वृत्तीकडे ओढले जाऊ शकतील अशा संवेदनशील व्यक्तीबरोबर प्रथम संपर्क साधला जातो.

अशा व्यक्तीबरोबर प्रयास कार्यकर्ते चर्चा करुन त्यांना गुन्हेगारी व वेश्यावृत्ती नशा आणि रस्त्यावरील जीवनाला पर्याय निर्माण होऊ शकतो. असा आशावाद निर्माण करतात आणि प्रयासच्या पुनर्वसन प्रक्रियेची माहिती देतात.

ब) परिवार सहाय्य:
ज्या केसेसमध्ये पारीवारिक पुर्नमिलन शक्य आहे. अशा ठिकाणी कार्यकर्ता अशील आणि परिवार यांच्यामध्ये दुवा म्हणून कार्य करतो आणि दोन्ही बाजूंचे मन:परिवर्तन घडवून आणतो. परिवाराकरिता अशीलाकडून आवश्यक सेवा पुरवून त्यांचा पाठपुरावा करतो. त्यामुळे व्यक्तीचे परिवारामध्ये पुनर्वसन होऊन समाजाच्या प्रवाहात सामावणे यशस्वी होते.

क) तात्काळ सेवा आणि निवास व्यवस्था:
ज्या केसमध्ये परिवारामध्ये पुन:प्रवेश नाकारण्यात येतो किंवा शक्यच नसतो किंवा व्यक्ती परिवारामध्ये परत जायलाच तयार नसते. अशावेळी कार्यकर्ता त्या व्यक्तीची तात्पुरत्या निवासाची व्यवस्था करतो. जेणेकरुन समाजविरोधी घटक त्याच्यावर दबाव आणून किंवा आमिष दाखवून आपल्याकडे ओढू नयेत. त्यामुळे पुनर्वसन प्रक्रियेते अडचणी येतात. तसेच आधीच किचकट असलेल्या पुनर्वसन प्रक्रियेत अडचणी निर्माण करणारा घटक म्हणजे त्याचे जुने मित्र — कौटुंबिक सदस्य जे पूर्वीपासून समस्याग्रस्त आहेत. सदर प्रक्रिया सुरु असताना व्यक्तीचे आजारपण, नैराश्य, भावनिक विमनस्कता, पोलीस प्रतिबंधक कारवाई या सर्व बाबी तात्काळ सेवा म्हणून पूर्ण करण्याकरिता उपलब्ध राहावे लागते त्यामुळे व्यक्तीचा विश्वास दृढ होण्यास मदत होते.

ड) शिक्षण आणि प्रशिक्षण:
व्यक्तीच्या तात्काळ अडचणींवर उपाय केल्यावर व्यक्तीला समाजात आत्मविश्वासाने उभे राहण्याकरिता प्रयत्न केले जातात. प्रयास याबाबत व्यक्तीचे शिक्षण, सामान्यज्ञान वाढविणे, माहितीच्या स्त्रोताशी व्यक्तीला जोडणे, कौशल्य वृध्दी करणे इ. उपक्रम जे व्यक्तीचे पूर्व शिक्षण, पूर्वानुभव, कौशल्य याच्याशी निगडित असावे असे प्रयत्न करते. याकरिता प्राथमिक पातळीवर संस्थेच्या केंद्रातच काही कार्यक्रमांचे आयोजन करुन निरीक्षणाव्दारे व्यक्तीचे कौशल्य आणि आवड पाहून त्याव्दारे भविष्यातील दिर्घकालीन नियोजन केले जाते.

इ) स्वयंसेवक प्रशिक्षण कार्यक्रम:
समुपदेशक, प्रशिक्षण कार्यकर्ता व शिक्षक यांच्या निरीक्षणावर आधारित, अशीलाची बाहेरच्या स्पर्धात्मक जगामध्ये बाहेर जाण्याची तयारी झाल्यावर स्वयंसेवक प्रशिक्षणाकरिता नियोजनबध्द कार्यक्रम तयार करण्यात येतो. या कार्यक्रमांतर्गत विविध संस्थांना भेटी देणे, अर्ध्या दिवसांच्या प्रशिक्षणाने सुरुवात करणे, अशाप्रकारे थोडा थोडा वेळ वाढवित जाऊन कार्यक्रम पक्का केला जातो. सदर कार्यक्रम संनियंत्रण कार्यकर्त्यांच्या नियमित पाठपुराव्याने आणि संबधित संस्थेच्या सहकार्याने राबविला

जातो. अशिलाच्या कौशल्य, पुर्वानुभव आणि आवड यावर आधारित संस्थांचा शोध घेऊन या व्यक्तीला जोडले जाते. अनेक अडचणींवर मात करुन कार्यक्रम यशस्वी करण्याकरिता अडचणींचे वैज्ञानिक विश्लेषण करुन उपाय शोधले जातात. व्यक्तीच्या जीवनात कार्यप्रणालीमध्ये स्थैर्य निर्माण होईपर्यंत ही प्रक्रिया राबविली जाते.

फ) निवारा आणि नागरिकत्व:

व्यक्तीच्या तात्काळ गरजा नियंत्रणात येऊन तो हळूहळू स्वत:च्या आयुष्यामध्ये स्थिरावत जातो, स्वत:चे निर्णय (सकारात्मक) घ्यायला लागला की व्यक्तीला स्वत:चा निवारा स्वत: शोधण्याकरिता प्रोत्साहित केले जाते. कार्यकर्त्याचे व्यक्तीबाबतचे निरीक्षण, तिची क्षमता, कमजोरी, समस्या किंवा परिस्थिती हाताळण्याचे कौशल्य आणि संयम इ. बाबी लक्षात घेऊन काम करणाऱ्या महिला/पुरूषांसाठीचे वसतिगृह, ग्रुपहोम, भाडेतत्वावरील घर इ. पर्याय सुचविले जातात. याच कालावधीमध्ये व्यक्तीला त्याच्या विविध नागरिक हक्कांबाबत जागृत केले जाते. त्याचप्रमाणे नागरिकत्व सिध्द होण्याकरिता आवश्यक असणाऱ्या विविध दाखले उदा. रेशनकार्ड, जन्मदाखला, बचत खाते, मतदार ओळखपत्र इ. कुठे मिळतात त्याबाबतची माहिती देणे. सदर प्रक्रिया व्यक्तीचे अशीलामधून नागरिक म्हणून रुपांतर होण्यास साहाय्यभूत ठरते.

# ३. आभार


- आर्थिक साहाय्य

- **धर्मादाय आणि निधी संस्था / गट**

आर. डी. टाटा ट्रस्ट
कन्सर्न इंडिया फाऊंडेशन
हीज हॉलीनेस डॉ. सैदेना ताहेर सैफुदीन मेमोरिअल फाऊंडेशन
श्री गणेश स्टील फर्निचर
फ्रेआ—इंडिया
इंडस इंटरनॅशनल
बाई फ्रेनी आणि सेठ फली वारीअवा चॅरिटेबल ट्रस्ट
दिलासा / अनुसंधान ट्रस्ट
वनिता समाज
शाह चुनिलाल मरीचंद चॅरिटेबल ट्रस्ट
इंडियन रेव्हेन्यू सर्व्हिस लेडिज असोसिएशन—मुंबई कस्टम
ॲक्शन एड (महिला अशिलांना स्वयंसेवी संस्था प्लेसमेंटसाठी प्रत्यक्ष पुरस्कृत)

- व्यावसायिक विभागातून योगदान

एच.डी.एफ.सी.
भारत पेट्रोलिअम कॉर्पोरेशन लि.
ठाकूर रेस्टॉरंट
ट्रेन्ट लि.
गुडलास नेरोलक पेन्टस् चॅरिटेबल ट्रस्ट
टेकनेट कर्मचारी

- शासकीय सहाय्य

केंद्रीय समाज कल्याण बोर्ड

- व्यक्तिगत

श्री दिलीप पंडित
श्री अश्विन वैद्य
श्री सुप्रिया जयकुमार
श्री राजन हिरानंदानी
श्री नितेश गोयल
श्री रांगी आणि श्रीमती गिता
श्रीमती क्लेअर डिसोझा
श्रीमती मुकुल रुस्तोगी
श्री आशु कलापा
श्री अंजली चाळीसगावकर
श्री श्रीकांत वचासपती
श्री संगिता मेनन
श्री स्मरण
श्री आलय शाह

❖ **प्रशासकीय सहाय्य**

**टाटा सामाजिक विज्ञान संस्था**

- **निदेशक**
- **कुलसचिव**
- **समाज कार्य विभागाचे शिक्षक आणि विद्यार्थी**
- **लेखा, मनुष्यबळ, भांडार, आणि डागडुजी विभाग**
- **वाचनालय**
- **दूरध्वनी चालक**

❖ **सल्लागार**

न्यायमुर्ती चंद्रशेखर धर्माधिकारी (निवृत्त)
श्रीमती मीरान बोरवणकर, भा.पो.से.
डॉ. माचिसवाला, मानसोपचारतज्ञ
श्रीमती अमिना युसुफ, वकील

❖ **क्षेत्रीय सहाय्य**

▪ **शासकीय संस्था/विभाग**

माननीय लोकायुक्त, महाराष्ट्र राज्य
**राष्ट्रीय मानव अधिकार आयोग**
**राष्ट्रीय महिला आयोग**
महाराष्ट्र राज्य महिला आयोग
**महाराष्ट्र राज्य समाज कल्याण सल्लागार मंडळ**
**बाल कल्याण समिती, मुंबई**
शिक्षण अधिकारी, बृहन्मुंबई महानगरपालिका
मुख्याध्यापक आणि इमारत प्रमुख, गिल्डर लेन महानगर पालिका शाळा, मुं. सेंट्रल

▪ **सरकारी आणि स्वयंसेवी संस्था**

- निवारा

| | |
|---|---|
| आश्रय–स्नेहसदन | स्नेहा जीवन केंद्र |
| कस्तुरबा महिला वसतिगृह | शांतीघर |
| सुखशांती | आसरा |
| साथी, मुंबई | सपोर्ट |
| ज्योतीस टर्मिनल सेंटर | बालप्रफुलता |
| बांद्रा इस्ट कम्युनिटी सेंटर | सलाम बालक ट्रस्ट |
| बापनु घर | बाल आनंद |

- **माहिती आणि मार्गदर्शन**
  अवेही
  ॲक्ट
  मजलीस
  संपर्क
  संकल्प

सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना
आय.पी.एच.
रेशनिंग कृती समिती
आय.सी.एच.आर.एल.

- **वस्तीपातळीवरील सेवा**
  आस्था
  प्रेरणा
  प्रथम
  महिला सहायता कक्ष
  तुर्भे हेल्थ प्रोजेक्ट
  अपनालय
  हमसफर ट्रस्ट

अक्षरा
टॅश फाऊंडेशन
जे.जे. नर्सिंग असोसिएशन
युसुफ मेहेरअली सेंटर, पनवेल
शांतिवन, पनवेल
सेवाधाम, ठाणे
मिडिया मॅटर्स, ठाणे

- **स्वयंसेवी संस्थांमध्ये प्लेसमेंट**
  ॲक्शन एड, मुंबई
  चाईल्डलाईन इंडिया फाऊंडेशन
  सर्मरिटन्स्
  सपोर्ट
  घर हो तो ऐसा (युवा)
  आसरा
  बाल प्रफुलता
  सलाम बालक ट्रस्ट
  विकास सहयोग प्रतिष्ठान
  हमारा क्लब
  प्रेरणा
  सर जे.जे. धर्मशाळा
  सेवा सदन
  साथी, नवी मुंबई
  साथी, मुंबई
  साथी, रायचूर
  रीप
  संपर्क

रेशनिंग कृती समिती
अपंगार्थ मार्गदर्शन आणि सेवा केंद्र
आस्था
फॅमिली वेल्फेअर एजन्सी
प्रोजेक्ट मेनस्ट्रीम
दोस्ती
ॲक्ट
प्रथम
सेवा सदन सोसायटी
स्त्री मुक्ती संघटना
कौसर ब्युटी पार्लर
नासिओ
आय.सी.एच.आर.एल.
फोर्स
लोकविकास सामाजिक संस्थान, नाशिक
वऱ्हाड, अमरावती
ॲक्टीव फ्रेंडस् सर्कल, सिंधुदुर्ग

- **व्यवसायभिमुख प्रशिक्षण**
  अपनालय पॅरा–प्रोफेशनल प्रशिक्षण
  प्रोजेक्ट मेनस्ट्रीम
  स्पॅस्टिक सोसायटी ऑफ इंडिया
  लाईफ लर्निंग एक्सपिरिअन्स
  खादी ग्रामोद्योग आयोग

सोशल सर्विस लिग
मोबाईल क्रेश
लोकसेवा प्रशिक्षण केंद्र
रीप

- वैद्यकीय उपचार

जे.जे. हॉस्पिटल(मनोविकृती विभाग)
के.ई.एम.हॉस्पिटल (मनोविकृती विभाग)
सायन हॉस्पिटल (मनोविकृती विभाग)
पोदार हॉस्पिटल
नायर हॉस्पिटल
श्रध्दा पुनर्वसन केंद्र
जैन हेल्थ क्लिनिक
शिवडी टी.बी. हॉस्पिटल
समॅरिटन्स्
पिपल्स मोबाईल हॉस्पिटल

- **कार्यजाळे (स्वयंसेवी संस्था, जिल्हा, राज्य, राष्ट्रीय प्रशासकीय आणि व्यक्ति)**

**दि बॅनियन, चेन्नई**
आर.एच.डी.सी. कोलकाता

- व्यक्ति

श्री रशिद तल्यारखान
श्रीमती शुभा मुझुमदार (के.व्ही.आय.सी)
श्रीमती दिव्या जैन
श्री देवेंद्र (सौभाग्य वस्तू भांडार)
श्री सुरेश पटेल (सोनाली मॅचिंग)
सलोनी एम्ब्रॉयडरीज्
डॉ. निलेश शाह
श्री वेंकटेश्वरन
श्री सिंग, टिकट तपासणीस, कल्याण
श्री अनिल श्रीवास्तव, नवी दिल्ली
श्री रतन सरकार, कोलकाता

- अभ्यांगत

निर्मला निकेतन सामाजिक कार्य महाविद्यालय
टाटा सामाजिक विज्ञान संस्थान
अमराई—चाईल्डलाईन
रीप

- शासकीय विभाग

महाराष्ट्र शासन

- गृह विभाग

श्री यु. के. मुखोपाध्याय, अतिरिक्त मुख्य सचिव, गृह—महाराष्ट्र राज्य
श्री पांडे बी. पी., मुख्य सचिव, (कारागृह)
श्री आर. एन. माळी, कक्ष अधिकारी

- कायदा विभाग

श्री एस. आर. डोंणगावकर, सचिव आणि वरिष्ठ कायदेविषयक सल्लागार
श्रीमती श्रध्दा वगळ, प्रशासकीय अधिकारी, बृहन्मुंबई कायदा सेवा अधिकार

- **कारागृह विभाग**
  श्री डी. टी. निंगलोवा, महानिरीक्षक
  श्री प्रभात रंजन, महानिरीक्षक
  श्री अशोक किनींगे, उप–महानिरीक्षक (दक्षिण विभाग)
  श्री डी. एन. दवणे, उप–महानिरीक्षक, कारागृह, (पूर्व विभाग)
  श्री डी. जी. चौधरी, उप–महानिरीक्षक, कारागृह, (मध्य विभाग)
  श्री जी. वेट्टीकुन्नल, संशोधन अधिकारी
  श्रीमती स्वाती साठे, अधीक्षक, मुंबई मध्यवर्ती कारागृह
  श्री रमेश कांबळे, अधीक्षक, भायखळा जिल्हा कारागृह
  श्री डी.के. बांगर, अधीक्षक, कल्याण जिल्हा कारागृह
  श्री राजेंद्र धामणे, अधीक्षक, ठाणे मध्यवर्ती कारागृह
  श्री वेंद्रे, अधीक्षक, येरवडा मध्यवर्ती कारागृह, पुणे
  श्री योगेश देसाई, मुख्याध्यापक, कारागृह अधिकाऱ्यांचे प्रशिक्षण महाविद्यालय, पुणे
  श्री के.पी. जाधव, मुख्याध्यापक, बोर्स्टल शाळा, पुणे
  श्री सुर्यवंशी, अधीक्षक आणि श्री पवार, वरिष्ठ तुरुंगाधिकारी, नाशिक मध्यवर्ती कारागृह
  श्री कांबळे, अधीक्षक आणि श्री साले, वरिष्ठ तुरुंगाधिकारी, धुळे जिल्हा कारागृह
  श्री पवार, अधीक्षक, जळगाव जिल्हा कारागृह
  उप–अधीक्षक, वरिष्ठ तुरुंगाधिकारी, न्यायालय विभागातील कर्मचारी आणि मुंबई सेंट्रल भायखळा जिल्हा, कल्याण जिल्हा आणि ठाणे मध्यवर्ती कारागृह संरक्षण कर्मचारी

- **महिला आणि बाल विकास विभाग**
  श्री एस.एस. डोड, मुख्य सचिव
  श्री सी. एस. तुरकर, उप सचिव
  श्रीमती चारुशिला चौधरी, कक्ष अधिकारी
  श्री दिलीप हिवराळे, अधीक्षक, संरक्षण गृह, चेंबूर
  श्री सावंत, अधीक्षक, स्पेशल जुवेनाईल होम, देवनार
  श्री सुरडकर, अधीक्षक, रिसेप्शन सेंटर, चेंबूर
  श्री ठोंबरे, जिल्हा परिविक्षा अधिकारी, मुंबई उपनगर
  श्री विचारे, जिल्हा परिविक्षा अधिकारी, मुंबई उपनगर
  श्री सैतवाल, परिविक्षा अधिकारी, धुळे
  श्री बोरसे, जिल्हा परिविक्षा अधिकारी, जळगाव
  श्री पाटील, परिविक्षा अधिकारी, जळगाव
  श्री जाधव, परिविक्षा अधिकारी, नाशिक
  श्रीमती वैशाली जाधव, परिविक्षा अधिकारी, संरक्षण गृह
  श्रीमती निरु शर्मा, परिविक्षा अधिकारी, स्पेशल जुवेनाईल होम
  श्रीमती कुडे, परिविक्षा अधिकारी, रिशेप्शन सेंटर
  संरक्षण गृह, स्पेशल जुवेनाईल होम, रिशेप्शन सेंटर येथील कर्मचारी
  मुंबई आणि ठाणे येथील परिविक्षा अधिकारी

- महाराष्ट्र पोलीस
  श्री प्रभात रंजन, उप–महानिरीक्षक (महिला अत्याचार निर्मूलन)

- मुंबई पोलीस
  श्री अहमद जावेद, संयुक्त आयुक्त (कायदा आणि सुव्यवस्था)
  श्री संदीप बिश्नोई, पोलीस उपायुक्त, गुन्हा विभाग (प्रतिबंधक)

- रेल्वे पोलीस, मुंबई
  श्री श्रीकांत सावरकर, आयुक्त
  श्री खोपकर, आयुक्तांचे स्वीय सहायक
  वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि सी.एस.टी. रेल्वे पोलीस ठाणे येथील कर्मचारी
  मध्य आणि पश्चिम रेल्वे पोलीस ठाणे येथील वरिष्ठ पोलीस निरीक्षक आणि कर्मचारी
  श्रीमती मुलानी आणि श्री गायकवाड, शिपाई, सी.एस.टी. रेल्वे पोलीस

- बृहन्मुंबई महानगरपालिका
  श्रीमती ज्योती पांडया, मुख्य कम्युनिटी डेव्हलेपमेंट अधिकारी
  श्रीमती अशोक मोहिते, सी.डी.ओ.
  श्री सलीम पटेल, सी.डी.ओ.
  श्री राजेंद्र बडे, सी.डी.ओ.

- सदस्य — बाल कल्याण न्यायालय
  श्रीमती निलिमा मेहता, अध्यक्ष, बालकल्याण समिती, मुंबई
  श्रीमती अंजली गोकर्ण, सदस्य, सी.डब्ल्यू.सी., मुंबई
  श्री गोरड, अधीक्षक, बाल सुधारगृह, उमरखाडी

- माननीय सदस्य न्यायव्यवस्था, मुंबई
  मा. श्री अभय ठिपसे, अतिरिक्त सत्र न्यायाधीश, सिटी सिव्हिल आणि सत्र न्यायालय
  मा. श्री आर.डी. गटे, मुख्य महानगर दंडाधिकारी
  मा. श्री डी.के. सोनावणे, महानगर दंडाधिकारी, एस्प्लानाड न्यायालय
  मा. श्री व्ही.पी. तावरे, एस्प्लानाड न्यायालय
  मा. श्री ठुकरुल, कुलसचिव, सी.एम.एम. ऑफिस, एस्प्लानाड न्यायालय
  मा. श्री पवार, सी.जे.एम. ठाणे
  मा. श्री डुबे, कल्याण न्यायालय
  मा. श्री भक्त, कल्याण रेल्वे न्यायालय
  मा. श्री आमले, भिवंडी महानगर न्यायालय
  श्री व्ही. एस. धावले, लिपीक, भिवंडी न्यायालय
  श्री दाबेकर, लिपीक, भिवंडी न्यायालय
  श्री जाधव, लिपीक, भिवंडी न्यायालय
  श्री खैरनार, लिपीक, भिवंडी न्यायालय

- शासकीय विधी न्यायालय, मुंबई
  प्रोफेसर, श्रीमती परिमला राव, मुख्याध्यापिका
  प्रोफेसर, श्रीमती चुगणी, प्रकल्प अधिकारी, कारागृह कायदा मदत प्रकल्प
  श्री विशाल कानडे, विद्यार्थी कोऑर्डिनेटर

- **वकील**
  **श्रीमती अनिता केवलरामणी**
  **श्रीमती अमीना इक्बाल**
  **श्री एच.आर. हंचाटे**
  **श्री अतुल वाघ**
  **श्री चेतन अग्रवाल**
  **श्री रमाकांत यादव**
  **श्रीमती मोनिका सखरानी**
  **श्री चेतन बने**
  **श्रीमती माहरुख एडनवाला**
  **श्री संजय कुरणे**
  **श्री एस.जी. रणदिवे**
  **श्री महेश पवार**
  **श्री विशाल मेंढे**
  श्री सिध्दार्थ भोईर
  श्री हर्षल पाटील
  श्री जी.ए. फकीह
  श्री जयसिंग बांगर
  श्री पी.एम. पाटील
  श्री मनोज म्हात्रे
  श्री एस.आर. श्रीवास्तव
  श्री युग चौधरी
  श्री पी.एन. शेट्टी
  श्री रविंद्र भाटकर
  श्री संजय सोनावणे
  श्री राजेश आसमार
  श्री पारकर

<u>भरुच विभाग</u>

❖ **शासकीय विभाग आणि अधिकारी**

- पोलीस
  श्री ए.बी. वासावा, माजी जिल्हा पोलीस अधीक्षक
  श्री जी.एस. मलेक, जिल्हा पोलीस अधीक्षक
  श्री पी.जे. सारंग, माजी पोलीस निरीक्षक, 'अ' पोलीस स्टेशन विभाग
  श्रीमती लिलाबेन केळवाला, पोलीस उप–निरीक्षक, महिला विभाग
  श्री जी.एम. सिंग, माजी पोलीस उप–निरीक्षक, 'अ' पोलीस स्टेशन विभाग
  श्री बी.एम. राठवा, माजी पोलीस उप–निरीक्षक, 'अ' पोलीस स्टेशन विभाग
  श्री व्ही.जे. फर्नांडिस, माजी पोलीस उप–निरीक्षक, 'अ' पोलीस स्टेशन विभाग
  श्री बी.व्ही. जाधव, माजी पोलीस उप–निरीक्षक, 'अ' पोलीस स्टेशन विभाग
  श्री आर.बी. बारीया, माजी पोलीस उप–निरीक्षक, 'अ' पोलीस स्टेशन विभाग
  श्रीमती के. मिनी जोसेफ, माजी पोलीस उप–निरीक्षक, 'अ' पोलीस स्टेशन विभाग
  श्री जी.एस.बारीया, माजी पोलीस उप–निरीक्षक, 'अ' पोलीस स्टेशन विभाग
  श्री आर.पी. पवार, माजी पोलीस उप–निरीक्षक, 'अ' पोलीस स्टेशन विभाग
  'अ' पोलीस स्टेशनचे सर्व कर्मचारी

- **कारागृह**

  श्री एच.आर. घेलट, भा.पो.से आणि महानिरीक्षक,कारागृह, गुजरात राज्य

  श्री उपेंद्रसिंग, भा.पो.से., अतिरिक्त अतिरिक्त महानिरीक्षक, कारागृह, गुजरात राज्य

  श्री सी.के. पटेल, माजी अधीक्षक, भरुच उप—कारागृह

  श्री आर.एस. गरासिया, तुरुंगाधिकारी, भरुच उप—कारागृह

  श्री डी.एम. नाय, वरिष्ठ, भरुच उप—कारागृह

- बालकल्याण न्यायालय

  श्री भारतभाई ठक्कर, अधीक्षक, निरीक्षण गृह

- **न्यायव्यवस्थेतील पदाधिकारी**

  मा. श्री ए.जी. उरेझी, जिल्हा आणि सत्र न्यायाधीश

  श्री ए.जे. पटेल, अधीक्षक, जिल्हा कायदा सेवा अधिकार

  जिल्हा आणि तालुका कायदा सेवा अधिकार यांचे अध्यक्ष आणि सचिव

- वकील

  श्री के.आर. जोशी

- संस्था

  श्री मोहम्मद फरशीवाला, भरुच कल्याण रुग्णालय

  महिला कानूनी सलाह केंद्र

  सेंटर फॉर सोशल जस्टीस

  श्री विल्यमभाई, मुक्त कायदा मदत ऑफिस, भरुच

  फादर मॅथ्यू कलानथिल, चटा उदेपूर

  वडीलो नी घर

प्रयासचे अशील आणि त्यांचे कुटुंबीय

❖ अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा संबंधित राष्ट्रीय कार्यशाळा

- राष्ट्रीय मानव अधिकार आयोग
  डॉ. न्यायाधीश ए.एस. आनंद, अध्यक्ष Chairperson
  न्यायाधीश श्रीमती सुजाता मनोहर, सदस्य
  श्रीमती एस.जलेजा, संयुक्त सचिव
  डॉ. सविता भाकरी, वरिष्ठ संशोधन अधिकारी

- महिला व बाल कल्याण विभाग, मनुष्यबळ विकास विभाग मंत्रालय, भारत सरकार
  श्रीमती कस्तुरी गुप्ता मेनन, सचिव
  श्रीमती विना राव, संयुक्त सचिव

- महिला व बाल कल्याण विभाग, महाराष्ट्र शासन
  श्री एस.एस. डोड, मुख्य सचिव

- **अर्थसहाय्य**
  राष्ट्रीय मानव अधिकार आयोग
  दोराबजी टाटा ट्रस्ट

- **निवासी व्यवस्था**
  वाय.एम.सी.ए. आंतराष्ट्रीय कार्यक्रम केंद्र
  हॉटेल साहिल

- न्यायाधीश सी.एस. धर्माधिकारी, (निवृत्त)

- श्रीमती सी.पी. सुजया, (निवृत्त भा.प्र.से.)

# ४. कारागृह विभाग

अ) <u>मुंबई मध्यवर्ती कारागृह:</u>

**प्रयासच्या कार्याची सुरुवात मुंबई मध्यवर्ती कारागृहामध्ये १४ वर्षांपूर्वी झाली. या कारागृहामध्ये संस्थेमार्फत विविध उपक्रम राबविले जातात. सदर उपक्रमांचा व्यक्तीवर होणारा परिणाम व त्याची उपयुक्तता याचे मूल्यमापन करुन सदर कार्यक्रम इतर कारागृहामध्ये राबविण्यासंबंधी विचार केला जातो. या वर्षभरात प्रयासच्या बरोबरीने इतर शासकीय—निमशासकीय व स्वयंसेवी संस्थांच्या मार्फत विविध कार्यक्रम राबविले गेले. त्यापैकी काही पुढीलप्रमाणे सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना, खादी ग्रामोद्योग आणि प्रोजेक्ट मेनस्ट्रीम श्रमिक विद्यापीठ इत्यादी.**

मुंबई महानगरपालिकेच्या समाज विकास अधिकाऱ्यांव्दारे सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजनेबाबत मुंबई मध्यवर्ती कारागृहातील युवा विभागातील बंदींना माहिती दिली व संबंधित योजनेअंतर्गत प्रशिक्षण दिले गेले. समाज विकास अधिकाऱ्यांच्या सहकार्याने प्रत्येक प्रशिक्षणार्थ्यांचे अर्ज लिहून घेतले. अर्जावर लावण्याकरिता प्रशिक्षणार्थींचे फोटो काढणे आवश्यक होते. त्याकरिता अधीक्षक साहेबांना भेटून आवश्यक परवानगी घेऊन फोटो काढण्यात आले. मेणबत्ती, अगरबत्ती, फिनेल, सर्फ इ. बनविणे यासारख्या प्रशिक्षणामध्ये युवा बंदींचा चांगला सहभाग होता. त्यांपैकी शिकलेले युवक त्याचवेळी त्यांच्या वहीत टिप्पण नमूद करत होते. काहीजण आपल्या मातृभाषेत लिहीत होते. तिन्ही प्रशिक्षणाव्दारे त्यांच्यातील शिकण्याची उमेद आणि नवीन माहिती मिळविण्याची भूक प्रकर्षाने जाणवली. शैक्षणिक स्तर कमी असला तरी काम शिकण्यामध्ये मुलांना विशेष रस होता. त्यामुळे त्यांचा मोकळा वेळ सदुपयोगी लागला आणि त्यांच्यातील चिडचिडा स्वभाव शांत झाला होता. खेळीमेळीचे वातावरण व परस्पर सहकार्य जाणवत होते.

या सर्व प्रक्रियेत सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजना आणि खादी ग्रामोद्योग आयोग या दोन सरकारी विभागांच्या कारागृह अधीक्षकांबरोबर चर्चा करुन व परस्पर सहकार्याने प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्यात आला. यावेळी विविध विभागांमध्ये समन्वय साधण्याकरिता पत्रव्यवहार, दूरध्वनी आणि प्रत्यक्ष भेटीव्दारे सतत पाठपुरावा करण्यात आला. याबरोबर प्रोजेक्ट मेनस्ट्रीम या संस्थेतर्फे व प्रयासच्या मदतीने कारागृहातील बंदींना वीजतंत्रीचे प्रशिक्षण देण्यात आले. या प्रशिक्षण कार्यक्रमानंतर आवश्यक असणारा सर्व पाठपुरावा करण्यात आला आणि सर्व सहभागी बंदींना प्रशिक्षण यशस्विरित्या पार पाडल्याबद्दल प्रमाणपत्र देऊन कौतुक करण्यात आले.

कारागृहातील बंदींमधील निरक्षरता आणि अज्ञान या बाबींचा विचार करुन त्यांची शैक्षणिक पात्रता आणि जाणीव जागृती वाढविणेबाबत प्रथम या पुर्वप्राथमिक व अनौपचारिक शिक्षण क्षेत्रात तज्ञ व अनुभवी संस्थेमार्फत कारागृहामध्ये साक्षरतासंबंधी कार्य सुरु व्हावे यादृष्टीने प्रयासने अधीक्षकांबरोबर एक बैठक घेतली व त्या बैठकीत कार्यक्रमासंबंधी चर्चा केली आणि त्यानुसार वेळापत्रक तयार केले. लवकरच कारागृहामधील युवा विभागात साक्षरता कार्यक्रम सुरु होईल.

ब) <u>भायखळा जिल्हा कारागृह</u>:

* **पुरुष विभाग:**

या कारागृहातील युवा विभागात सरासरी ८० ते ९० तरुण बंदी आहेत. यातील ९० टक्के तरुण किरकोळ गुन्ह्यांमध्ये अटक झालेले आहेत. मुंबई पोलीस कायदा, रेल्वे कायदा, रेल्वेच्या संपत्तीची चोरी, खिसेकापू, सोनसाखळी चोरी, विना तिकीट प्रवास, रेल्वेच्या जागेतील फेरीवाले तसेच संशयित म्हणून अटक केलेले अशा प्रकारचे युवा बंदी बाबा बॅरेकमंध्ये आढळतात.

यांतील बहुतांशी तरुण बिहार, उत्तर प्रदेश, बंगाल, मध्य प्रदेश, अशा विविध राज्यातील ग्रामीण मागास भागातून नोकरी धंद्यासाठी आलेले आहे. त्यापैकी काही तरुणांना नोकरी मिळवण्याचे कौशल्य आहे. सुतारकाम, गवंडी, जरीकाम अशा प्रकारचे कौशल्य फारच थोडया जणांना आहेत. ज्यांच्याजवळ कौशल्य नाही ते युवक वाडी काम (वेटर), उपहारगृह, छोटया उद्योगधंद्यामध्ये काम करुन तसेच फुटपाथवर झोपणे. अशा नाजूक स्थितीत असल्यामुळे व्यसने आणि संगत यामुळे बाहेरील राज्यातील युवक वेगवेगळया, किरकोळ गुन्ह्यांमध्ये अटक होऊन येतात. यातील एक गट असा आहे की त्यांची वर्तणुक आणि व्यसनामुळे सातत्याने गुन्हेगारीमध्ये आढळतात.

* स्थानिक तरुण:

स्थानिक तरुण हे थोडया प्रमाणात आहेत. फुटपाथ व गरीब वस्त्यांमधून येणाऱ्यांचे प्रमाण अधिक आहे. वाडी बंदर, रे रोड, मसजिद, व्ही.टी. तसेच इतर तरुण हे त्यांच्या कौटुंबिक वादामुळे त्यांच्या वर्तणुकीवर गंभीर परिणाम झाल्यामुळे; तसेच झटपट श्रीमंत होण्याचे स्वप्न, समाजात स्थान (स्टेटस) मिळवण्याचे उद्दिष्ट, मित्रांच्या संगतीने गुन्ह्यात आलेले असतात. त्यांच्या गुन्ह्यांचे स्वरुप घरफोडी, मारामारी, सर्वसाधारण चोरी, दादागिरी अशा प्रकारचे असते.

या बॅरेकमधील युवकांचा शैक्षणिक व सामाजिक दर्जा आणि कौटुंबिक, आर्थिक परिस्थिती अत्यंत कमकुवत आहे. त्यामुळे या बॅरेकमध्ये काम करताना प्रामुख्याने पर्सनल बाँड, जामीन, परिविक्षा इ. करिता अर्ज लिहीणे, वकीली सेवा पुरविणे अशीलांकडे गृहभेट करणे. अशील गुन्हेगारीमध्ये पुन्हा न येण्याकरिता समुपदेशन करणे. समुपदेशन करण्याकरिता युवकांचे मन:परिवर्तन करण्याकरिता प्रथम त्यांना मनोरंजनाव्दारे आकर्षित केले जाते. त्याकरिता खेळ, गाणी, इत्यांदींचे आयोजन करणे. वेगवेगळया विषयावर विशेषज्ञांच्या सत्राचे आयोजन करण्यात येते.

* **महिला विभाग:**

२ ऑक्टोबर २००३ पासून मुंबई मध्यवर्ती कारागृहातून महिला विभाग भायखळा जिल्हा कारागृहामध्ये समाविष्ट करण्यात आला. भविष्यात भायखळा जिल्हा कारागृहाला महिला कारागृहाचा दर्जा देण्याचे शासनाच्या विचाराधीन आहे. मुंबई मध्यवर्ती कारागृहातील वाढती संख्या व अपूरी पडणारी व्यवस्था या कारणामुळे हा बदल करण्यात आला. या कारागृहाची क्षमता १०० असून महिला विभागामध्ये १५० ते २०० पर्यंत महिला असतात. २० ते ६० वर्षांपर्यंतच्या महिला वेगवेगळया गुन्ह्यात आलेल्या आहेत. यापैकी काही महिलांना कौटुंबिक आधार आहे तर बहुतांशी महिला कुटुंबातून निर्वासित झाल्यासारखी परिस्थिती आहे. ज्या महिलांना बाहेर कोणत्याही प्रकारचा आधार नाही त्यांना भेटण्यास कोणीही येत नाही. अशा महिलांना कारागृहामध्ये काही मूलभूत गरजांकरिता (साबण, तेल इत्यादी) दुसऱ्या महिलांवर अवलंबून राहावे लागते. काहींना जामीनाची रक्कम कमी असूनही जामिन करणारे कुणी नसल्यामुळे बरेचदा शिक्षेपेक्षा अधिक कालावधी व्यतित करावा लागतो. त्यामुळे त्यांना आतील सराईत महिलांचे वैयक्तिक (कपडे, भांडी धुणे, इ.) काम ऐकून त्यांच्या दबावाखाली राहावे लागते. या कामातून मिळणाऱ्या पैशातून त्या त्यांच्या मूलभूत गरजा आणि वकीलाचे मानधन किंवा जामीनाची रक्कम जमवतात.

ज्या महिला गरीब, शांत किंवा मितभाषी आहेत, एखादी नवीन बाई आली तर तिला आणि तिच्या मुलाकरिता विशेष पूरक आहार मिळणेबाबत काही तक्रार असेल, काही महिलांना कारागृहातून न्यायालयात नेण्याकरिता नियमित सुरक्षा रक्षक उपलब्ध होत नाहीत अशाप्रकारच्या तक्रारी कार्यकर्तीकडे आल्यास त्याबाबत संबंधित कारागृह कर्मचारी आणि अधीक्षक यांच्याशी संपर्क साधून त्यावर उपाय काढण्याचा प्रयत्न केला जातो.

० ते ५ वयोगटातील मुले जी आपल्या मातांबरोबर कारागृहात आहेत त्यांच्याकरिता कारागृहातून अंडी, केळी, दूध, डाळभात असा अतिरिक्त आहार मिळतो. २० टक्के महिलांबरोबर प्रयासचे नियमित आणि दूरगामी काम चालू आहे. इतर महिलांबरोबर तात्पुरत्या आणि तात्काळ स्वरुपाचे कार्य आहे कारण हा गट सराईत प्रकारचा व पुनर्वसनाची भाषा न समजणारा असा आहे. कारागृहात जे प्रशिक्षण चालते त्याचा फायदा हा गट योग्यप्रकारे घेतो. कारागृहात सध्या प्रयास व्यतिरिक्त इतर काही संस्था वेगवेगळे कार्य करीत आहेत.

बऱ्याचशा महिलांच्या शारीरिक व मानसिक वैद्यकीय समस्या आहेत. त्यात खाज, खरुज, पुळया येणे, स्त्रियांचे काही आंतरिक आजार, दमा, कर्करोग, मुलांचे आजार (सर्दी, खोकला, ताप वगैरे) क्षयरोग, एडस्, मानसिक आजार, इ. प्रकारचे आजार दिसून येतात. तसेच गरोदरपणा, वैयक्तिक स्वच्छतेचा अभाव, पूर्वीचा आजार, गर्दी असल्याने लवकर संसर्ग होऊन पसरत जाणे. मानसिक रुग्णांना तज्ञ वैद्यकीय अधिकाऱ्याचे उपचार व प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यामुळे प्रादेशिक मानसिक रुग्णालयात स्थलांतर करणे शक्य होत नाही. कारागृहाच्या या वातावरणात येऊन शांत गट देखील नंतर हुशार बनतो. कधी हाच सराईत गट सामान्य महिलांच्या समस्या समोर ठेवून भांडत असतो. आतमध्ये प्रत्येकाचा वेगळा असा गट आहे. ही माझ्या गावची आहे,

माझी भाषा बोलते, माझ्यासारखाच गुन्हा केला आहे, शांत आहे अशा काही लक्षणांवरुन गट बनवतात. सकाळी उठल्यावर भत्ता घेणे, आंघोळ करणे, कपडे धुणे, जेवणे, गप्पा, मेकअप, ह्या गोष्टीत काहींचा वेळ जातो तर काही मात्र वेळेवर प्रशिक्षणाला येणे चांगल्या गोष्टींमध्ये (प्रशिक्षण, प्रार्थना, नामस्मरण) ह्यात वेळ देतात. आता सध्या कारागृहात शिवणकला प्रशिक्षण फ्रिडम फाऊंडेशन संस्थेमार्फत, साक्षरता व बालवाडी प्रथम संस्थेमार्फत, कायदेशीर मदत, समुपदेशन व पुनर्वसनाचे कार्य प्रयासमार्फत अशा स्वरुपाचे काम चालू आहे.

कारागृहामध्ये सरासरी १२५ ते १५० महिला आहेत. त्यापैकी ४० महिलांबरोबर संपर्क झाला आणि १८ महिलांबरोबर दिर्घकालीन व सविस्तर काम झाले. मागील सहा महिन्यात १६ महिला प्रयासची मदत घेऊन बाहेर सुटल्या. त्यापैकी ३ महिला नियमित संपर्कामध्ये आहेत.

ज्या महिलांबरोबर संपर्क झाला त्या चोरीचा माल खरेदी करणे, चोरी, मारामारी, खुनाचा प्रयत्न, फसवणूक, अपहरण, शासकीय जागेत घर बांधणे, इ. कलमांतर्गत आहेत. यामध्ये पश्चिम उपनगरातील महिलांचे प्रमाण अधिक दिसून येते. काही महिला मध्य व पूर्व मध्य उपनगरातील आढळून येतात. बहुतांशी महिला चाळीत, झोपडपट्टीत किंवा रस्त्यावर राहणाऱ्या असून त्यांची घरची परिस्थिती अतिशय बिकट काहींची जेमतेम बरी अशी आहे. काहींना कोर्ट, पोलीस ठाणे, कारागृह याबद्दल काहीच माहिती नव्हती, काहींचे पाठपुरावा करणारे कुणी नव्हते, काही कुटुबांनी अशीलाच्या स्वैर वागणुकीला कंटाळून कुटुंबातून काढून टाकले आहे. ज्या महिला मानसिकदृष्टया आजारी आहेत त्यांच्या कुटुंबाचा ठावठिकाणा मिळत नाही.

काही महिला बंदी जीवनामध्ये आलेल्या अपयशाने खचून जाऊन निराशेपोटी आपले जीवनच संपविण्याच्या दिशेने वाटचाल करीत असतात. अशावेळी आजारामध्ये योग्य व नियमित औषधोपचार न घेणे, प्रिय व्यक्तीबरोबर नातेसंबंध टिकवून ठेवण्याकरिता त्या व्यक्तीकरिता अवास्तव खर्च करण्यासाठी गुन्ह्यामध्ये राहणे इत्यादी मार्ग अवलंबतात. अशावेळी प्रयास सारख्या एका संस्थेचे प्रयत्न अपुरे पडतात. तेव्हा परिवाराने आणि समाजाने पुढे येऊन सामंजस्याने अशा व्यक्तींना आधार देवून नवीन जीवन जगण्याकरिता संधी दिली पाहिजे.

क) <u>ठाणे मध्यवर्ती कारागृह</u>:

ठाणे मध्यवर्ती कारागृहातील युवक विभागामध्ये १८ ते २३ वर्षे वयोगटातील बंदीसोबत प्रयासचे कार्य सुरु आहे. सदर विभागामध्ये वर्षभरात बंद्यांची संख्या १२० ते १५० च्या आसपास असते. त्यामध्ये ९५ टक्के बंदी हे कच्चे बंदी आहेत; या बंद्यामध्ये दोन प्रकारच्या गटाबरोबर संस्थेचे कार्य चालते १) स्थानिक बंदी २) मुंबई बाहेरील (स्थलांतर करुन आलेले)

सदर विभागामध्ये स्थानिक बंदी अधिक प्रमाणात म्हणजे ७० टक्के आहेत उदा. मुंबईच्या पश्चिम भागातील गोरेगाव ते पालघर आणि कुर्ला व आसपासची उपनगर तसेच मुंबईबाहेरील बंदीचे प्रमाण ३० टक्के आहे. हे वेगवेगळया गुन्ह्यामध्ये उदा. रस्त्यावरची चोरी, रेल्वेमध्ये चोरी, घरफोडी, मारामारी, खून दरोडा. किशोर विभागाव्यतिरिक्त इतर विभागातील बंद्याकडून सामाजिक कार्यकर्त्याकडे स्वतंत्रपणे केसेस येतात. तसेच कारागृह कर्मचारी सुध्दा बऱ्याचशा केसेस सामाजिक कार्यकर्त्याकडे पाठवितात.

- **कारागृहातील प्रत्यक्ष काम:**

प्रयासचे कारागृहातील काम म्हणजे बंदीचे समुपदेशन करणे, चार्जशीट वाचून दाखवणे व त्यातील माहिती देणे, त्यांनी गुन्हेगारी क्षेत्रातून बाहेर येण्यासाठी व सामाजिक बांधिलकी स्विकारणे संबंधी त्यांना मार्गदर्शन करणे व त्यांचे मनपरिवर्तन करण्याचा प्रयत्न करणे, केस संदर्भात व पुनर्वसनासंदर्भात काही निरोप किंवा माहिती देण्या--घेण्याबाबत त्यांच्या घरी फोन करणे किंवा प्रत्यक्ष घरी भेट देणे, शक्य तेवढे कायदेविषयक मार्गदर्शन करणे, आवश्यकतेप्रमाणे वकील मिळवून देणे, त्यांना धीर देणे, नियमित चर्चा करुन त्यांच्या पुढील पुनर्वसनासंबंधी नियोजन करणे.

- **कारागृहाबाहेर प्रत्यक्ष काम:**

बंद्याच्या किंवा त्यांच्या कुटुंबाच्या मूलभूत गरजा समजावून घेऊन त्या मिळवून देण्याचा प्रयत्न करणे तसेच त्या दृष्टीने मार्ग दाखविणे

अ) व्यवसायासाठी मदत – १) भाजीपाला धंदा २) वडापाव धंदा<br>
ब) वैद्यकीय मदत – १) औषधोपचार २) सकस आहार व इतर खर्च<br>
३) रुग्णालयामध्ये दाखल करणे.<br>
क) कुटुंबाला मदत – १) शैक्षणिक मदत २) रेशनिंगची मदत ३) तात्काळ मदत

- **निरीक्षण:**

काम करत असताना असे आढळले की बऱ्याचशा मुलांचे पालक एकटेच आहेत. उदा. फक्त आई किंवा वडील किंवा अनाथ आहेत. असे असल्यामुळे साहजिकच लहानपणापासून त्यांच्याकडे पालकांचे म्हणावे तेवढे लक्ष नव्हते व आर्थिक परिस्थिती अत्यंत बिकट असल्यामुळे कामाच्या व्यापातून मुलांवर लक्ष देणे शक्य नसल्यामुळे ही मुले वस्तीतील इतर उनाड किंवा टपोरी मुलांबरोबर संगत करत असतात किंवा त्यांच्या संगतीमध्ये वेगवेगळया कारणांनी जोडली जातात.

उदा. कुणाबरोबरतरी बिअर बार मध्ये जाणे, सिनेमा पाहायला मोठया सिनेमा गृहामध्ये किंवा व्हिडीओ पार्लरमध्ये नेणे अशाप्रकारे मित्रांबरोबर अनेक गोष्टीमध्ये आवड निर्माण झाली की मग या सर्व गोष्टी मिळविण्याच्या प्रयत्नात त्यांच्याकडून काहीतरी चूक घडते किंवा त्यांना एखाद्या गुन्ह्यामध्ये मित्रांकरवी गोविले जाते आणि त्यांना कारागृहात येण्यास भाग पडते. सदर घटनांचा सखोल विचार करता पुढील चार प्रकारच्या परिस्थिती दिसून येतात.

१. काही व्यक्तींचे परिवार सक्षम व सतर्क आहे. तसेच व्यक्तीचे व्यक्तिमत्व ठीक आहे.
२. काही व्यक्तींचे परिवार सक्षम व सतर्क आहे. परंतु व्यक्तीच्या व्यक्तिमत्वामध्ये काही दोष दिसून येतात.
३. काही परिवारामध्ये व्यसनाधिनता, अनैतिकता व अराजकता आहे. परंतु व्यक्तीचे व्यक्तिमत्व ठीक आहे.
४. काही परिवारामध्ये उपरोक्त समस्या आहेत तसेच व्यक्तीच्या व्यक्तिमत्वामध्ये देखील समस्या आहेत

उपरोक्त परिस्थितींमध्ये कार्य करित असताना व्यक्तीच्या व्यक्तिमत्वावर परिणाम करणारी इतर कारणे लक्षात घ्यावी लागतात कारण त्याचा परिणाम पुनर्वसन प्रक्रियेत होत असतो.

कारागृहामध्ये बंद्यांची वाढती लोकसंख्या लक्षात घेता बंद्यांना कोर्टात ने–आण करण्यासाठी लागणारे सुरक्षा रक्षक कमी पडत असतात. म्हणून ठाणे पोलीस आयुक्त व त्यांचे संबंधीत सहकारी व ठाणे ग्रामीण अधीक्षक व सहकारी यांच्याशी सुरक्षा रक्षक संबंधात चर्चा केली व दोन्ही अधिकाऱ्यांच्या मिटींगमध्ये असे ठरले की ज्या बंद्याची केस चालू नाही व फक्त तारीख घेण्यासाठी कोर्टात न्यायचे अशा बंद्याऐवजी ज्यांची केस चालू आहे अशा बंद्याना प्राधान्य देऊन त्यांना कोर्टात हजर करण्याची जबाबदारी व ज्या बंद्यांना सलग तीन महिन्यापेक्षा जास्त दिवस कोर्टात हजर केले नाही. त्यांना सुध्दा कोर्टात हजर करण्याची जबाबदारी ठाणे पोलीस आयुक्त व ठाणे ग्रामीण पोलीस अधीक्षक यांनी घेतली आहे.

तसेच सदर बैठकीनंतर सामाजिक कार्यकर्त्यांकडून ठाणे कारागृहातील काही केसेस पोलीसांना देण्यात आल्या त्या केसेसना त्यांच्याकडून गार्ड पुरविण्यात आले. त्यामुळे सदर केसेस बाबत कोर्टात निर्णय त्वरित लागले.

ड) <u>कल्याण जिल्हा कारागृह</u>:

* महिला विभाग

प्रयासच्या कार्यकर्त्यानि कल्याण जिल्हा कारागृहात ७८ केसेस हाताळल्या. त्यापैकी ३६ केसेसमध्ये पुनर्वसनाच्या दृष्टीने काम झाले. मागील वर्षात २७ महिलांची सुटका झाली आणि सर्व प्रयासच्या संपर्कात आल्या. त्यापैकी १८ महिलांबरोबर काम करणे शक्य झाले.

पुनर्वसनाकरिता काही प्रक्रिया कारागृहापासून सुरु होते. कारागृहात कार्यकर्ती अशीलाचा स्वभाव पडताळणी करते. नंतर व्यक्तीचे हक्क आणि विश्वास तयार करण्याच्या हेतूने अशीलाला सेवा पुरविण्यात येतात. गेल्या वर्षी समुपदेशन, कुटुंबाला आर्थिक मदत, मुलांना शैक्षणिक मदत, वैद्यकीय मदत, घर दुरुस्ती इत्यादी

चालू वर्षी, अशीलांच्या घरची परिस्थिती जाणून घेण्याकरिता गृहभेटी करण्यात आल्या. गृहभेटीचा मुख्य उद्देश अशीलाच्या मुलांची परिस्थिती, आर्थिक परिस्थिती, सामाजिक साहाय्य, अशीलाची पार्श्वभूमी, इत्यादी असा आहे. काही भेटी सुटून आलेल्या महिलांच्या घरी करण्यात आल्या. त्या भेटींमुळे ८ मुलांचे शिक्षण सुरु झाले की जे त्यांच्या आईच्या कारागृहीन शिक्षेमुळे बंद झाले होते. गृहभेटीमुळे कार्यकर्तीला तिच्या भविष्यकालीन कार्य योजनेकरिता मदत करते. सुटून गेलेल्या महिलांच्या केसेसमध्ये त्यांच्या जीवनातील परिस्थितीचा ज्या ते अनुभवतात त्यांच्या पाठपुरावा करण्याकरिता गृहभेटी केल्या जातात.

ठाणे जिल्हा न्यायालयात न्यायालयीन भेटी केल्या गेल्या. १७ महिलांना या भेटींचा लाभ झाला. शासन व्यवस्थेच्या दुर्लक्षामुळे महिलांना न्यायालयात नेले जात नाही. महिलांना त्यांची पुढची तारीख व केसमधील परिस्थिती कळत नाही. कुटुंबांना न्यायालय तारीखांबद्दल माहिती मिळत नाही. तसेच वकील त्यांना केसबाबत काही माहिती देत नाहीत. या बाबतीत कार्यकर्ती त्यांना त्यांच्या केस बाबतीत प्रत्यक्ष न्यायालय व वकीलांमार्फत माहिती देण्याची मदत करते. शक्य असेल त्याप्रमाणे दूरध्वनीव्दारे माहिती एकत्रित केली जाते.

बंदी महिलांच्या मुलांच्या शिक्षणाच्या गरजेनुसार, अशीलांच्या गरजा आणि सेवा पूर्ण करण्याकरिता, कारागृहात प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याकरिता, वेगवेगळया संस्थांना भेटी करण्यात आल्या. मनोरुग्णांच्या तपासणीसाठी २ महिलांना मानसिक रुग्णालयात घेऊन दाखविण्यात आले.

अशीलांबरोबर काम करण्याकरिता त्यांच्या पार्श्वभूमीची माहिती आवश्यक असते आणि ती माहिती पोलीस स्टेशनला उपलब्ध असते. त्याकरिता पोलीस स्टेशन भेटी करण्यात आल्या.

सध्या, ठाणे कारागृहातील १० महिलांचे पुनर्वसन झाले. ७ महिला प्रयासच्या संपर्कात आहेत. ८ महिला त्यांच्या सुटकेनंतर प्रयासच्या संपर्कात आल्या परंतु त्यांचा नियमित संपर्क नाही. प्रयासचा नियमित पाठपुरावा चालू आहे.

❖ महिला विभागात प्रशिक्षण कार्यक्रम:

कारागृहातील महिला विभागाची एकूण क्षमता ३५ आहे. पण कारागृहात १६० स्त्रिया आहेत. त्यामध्ये ८० स्त्रिया बांग्लादेशी आहेत. त्यामधील काही स्त्रियांना हिंदी समजते. तर काहींना बंगाली भाषा समजते त्यामुळे त्यांना शिकवण्यास भाषेमुळे थोडा अडथळा निर्माण होतो. मग आम्ही त्यांच्यापैकी समजुतदार मुलीला सांगून त्यांना समजविण्याचा प्रयत्न करतो. या महिलांमध्ये काही चोरी, खून तर कोणी सासूला जाळले तर कोणी सुनेला जाळले अशा प्रकारच्या गुन्ह्यात येतात. त्यांना न्यायालयाची तारीख आली की संरक्षण येत नाही. त्यामुळे त्या एकदम निराश बनतात व गप्प

आपल्याच विचारात बसतात. त्यांना असे वाटते की आमच्या मुलांना शाळेत कोण घेऊन जाणार, त्यांना वह्या, पुस्तके कोण देणार त्यांचे सांभाळ कोण करणार याविषयी त्या मनातुन दुःखी बनतात. त्यांना नंतर समजविण्याचा प्रयत्न करतो. भारतात आल्यावर मिळेल ते काम त्या करतात. मोल मजूरी, गवंडीकाम बारमध्ये वेश्या व्यवसाय करतात. म्हणून त्यांच्या देशात त्यांचे पुनर्वसन चांगले पध्दतीने झाले तर ते काहीही करुन पोट भरु शकतील व काही काम करुन आपले संसार कुंटुंबात सुखाने राहू शकतील. तेथील स्त्रियांकडे कला छान आहे व त्यात सरकारची मदत असली तर त्यांचे पुनर्वसन चागले होईल.

| शिवणकाम | लोकरीचे काम | रंगकाम | विणकाम | फुले बनविणे |
|---|---|---|---|---|
| झबले<br>टोपरे<br>पेटीकोट<br>ब्लाऊज<br>परकर | मनी पर्स<br>वह्या<br>तोरण<br>बॅग<br>ताटावरचे<br>रुमाल<br>फोनवरचे<br>रुमाल | भेटकार्ड<br>कपडयावर<br>रंगकाम<br>टेबल क्लॉथ<br>रुमाल | उशी अभ्रे<br>टेबल क्लॉथ<br>रुमाल<br>इत्यादी | गुलाबाची फुले |

मोत्यांचे दागिने, बांगडया, कर्ण आभूषण, बिंदी, अंगठी, लॉकेट तसेच कागदी पिशवी, पाकीट बनविणे इ. प्रकारचे प्रशिक्षण दिले जाते.

❖ बालवाडी कार्यक्रम:

कल्याण कारागृहात गेली दीड वर्षे बालवाडी चालू आहे. बालवाडीत येणाऱ्या मुलांची संख्या नेहमी बदलत असते. त्यामुळे तेथे एकच वर्षाचा नियमित असा पाठयक्रम चालू ठेवता येत नाही. नेहमीच मुले वेगवेगळी असल्याने एकदा झालेली गोष्ट, गाणी, खेळ किंवा इतर मनोरंजनाचे कार्यक्रम हे नवीन मुले आल्याने पुन्हा पुन्हा घ्यावे लागतात पण हे सर्व त्या मुलांसाठी नवीन असते. पूर्ण आठवडयाचा कार्यक्रम ठरलेला असतो. आठवडयातून ३ वेळा बालवाडी घेतली जाते. त्या तीन दिवसाच्या कार्यक्रमाची यादी अगोदरच करुन ठेवली जाते.

उदा.

| | | | | |
|---|---|---|---|---|
| सोमवार | गाणी | हजेरी | चित्रकला | खेळ |
| बुधवार | गाणी | हजेरी | कागदी वस्तू | खेळ |
| गुरुवार | गाणी | हजेरी | रंगकाम | खेळ |

वरील कार्यक्रमात वेळेनुसार व गरजेप्रमाणे फेरफार केले जातात पण दिनक्रम तोच राहतो कारण मुलांनाही त्यांची सवय लागते व त्यांनाही कळते की आता काय करायचे आहे किंवा शिक्षक आता वेगळे काय सांगणार तर आपण शांत बसून राहावे.

अशीच सवय त्यांना शाळेत लावली जाते तर इतर शाळेप्रमाणे ह्या बालवाडीची वातावरण निर्मिती करण्यात काही अडचणी येतात. काही मुलांच्या मातांना याचे महत्व पटवून सांगणे कठिण जाते. सुरुवातीला मुले मातांपासून वेगळे करुन बालवाडीत आणणे कठिण असते.

▪ बंदी मातांसोबत काम:

मुले बालवाडीत बसतात तेव्हा त्यांच्या आईबरोबरही त्यांच्या सवयी, बोलणे वगैरे ह्या गोष्टीचा विषय असतो. पण मग तो विषय बदलून त्या महिलेच्या केस वर जातो. ती महिला कोण आहे, कोठे राहणारी, काय काम करीत होती. घरी कोण कोण राहते व ती कोणत्या केस अंतर्गत कारागृहात आली. त्यामागे कारण काय ह्या सर्व गोष्टी ऐकल्या जातात.

पहिली गोष्ट म्हणजे ती महिला लगेच आपल्याकडे येत नाही किंवा वरील बाबीं बाबत आपल्या बरोबर चर्चा करीत नाही. अगोदर ती मुलाला पाठविते. त्याला खेळताना शिकताना पाहते. मग थोडा विश्वास बसल्यावर ती स्वत:साठी बसते. सुरुवातीला मुलाबद्दल बोलते, ऐकते. नंतर मग काही दिवसांत ओळख वाढवते. नंतर मग हळूहळू स्वत: बद्दल बोलायला सुरुवात करते.

हे सर्वच महिलांबद्दल होते असे नाही. काही महिला लगेच येतात व काही तर येत सुध्दा नाही. काही फक्त त्यांच्या कामासाठी येतात. म्हणजे त्यांच्या घरी जर लहान मुले असतिल तर त्यांची शाळा, आरोग्य घर वगैरे या बाबत चौकशी करणे. मुलांना पाहणारे जर घरी मोठे कोणी नसेल तर त्याच्या म्हणण्यानुसार त्यांच्याबरोबर काम केले जाते.

▪ बंदी महिलाच्या कारागृहाबाहेरील मुलांसोबत केलेले काम:

महिला बंदि असताना जर मुले बाहेर असतील तर ह्या ठिकाणी त्याच्या मुलांची काळजी घेणे हे मुख्य धोरण आहे कारण आई व इतर कुणी कारागृहात असेल तर घरी मुलांना पाहणारे कुणी नसते मग त्या ठिकाणी घरी मुलांची चौकशी करुन त्यांची व्यवस्था निवासी संस्थेत करणे किंवा मग त्यांच्या नातेवाईकाकडे त्यांना सोपविणे इ. केले जाते. त्याठिकाणी मग कारागृहाकडे अर्ज देणे. मुलांना बाल कल्याण समितीसमोर उभे करुन त्यांना संस्थेत प्रवेश देणे हे काम केले जाते.

त्याचबरोबर कारागृहातील महिला (बांगलादेशी) व तिची निरिक्षण गृहामध्ये असणारी मुले त्यांची मुलाखात केली जाते. गेल्या वर्षात बांगलादेशी मुलांच्या मुलाखती अधिक प्रमाणात झाल्या. त्या मुलाखती दरम्यान काही अडचणी आल्या. एकावेळी ६ मुलांची (तीन महिलांची) मुलाखत करण्यासाठी ४ महिने लागलेत कारण निरीक्षणगृहाकडे मुलांना ने—आण करण्यासाठी सुरक्षा रक्षक नव्हते. आणि सर्व मुलांना एकत्र नेण्यासाठी गाडीही नव्हती. म्हणून १—२ महिन्याच्या अंतराने दोन दोन मुलांचा गट करुन त्यांची मुलाखात आईबरोबर केली गेली.

काही महिलांची मुले बाहेर आहेत व शाळेतही जातात पण शिक्षणासाठी पुरेसे अर्थसहाय्य नसताना मग संस्थेकडून मुलांच्या शिक्षणांसाठी आर्थिक मदत वह्या पुस्तके व शाळेचा गणवेश देण्यात आला.

एका महिलेने तिच्या मुलांना संस्थेत ठेवण्याची मागणी केली होती पण पुरेशी माहिती व कागदपत्रे नसल्याने ते ॲडमिशन झाले नाही. संस्थेच्या अटी पूर्ण करण्यासाठी जास्त धावपळ होते त्यामुळे मुलांचे शैक्षणिक नुकसान होते. आजही काही मुले शाळा सुटल्याने किंवा इतर कारणाने बाहेर आहेत. अशा मुलांचे लवकरात लवकर संस्थेत किंवा शाळेत ॲडमिशन करण्याचे काम सुरु आहे.

❖ **पुरुष विभाग:**

कल्याण जिल्हा कारागृहातील मुख्य काम युवा बॅरेकमधील बंदींबरोबर आहे. सध्या युवा बॅरेकची लोकसंख्या ७५ ते १०० च्या आसपास आहे. वेगवेगळया गुन्ह्यांमध्ये अटक झालेले युवक या कारागृहात आहेत.

▪ **कामाचे स्वरुप:**

या ठिकाणी येणारे बंदी पुन्हा कारागृहात फिरुन येऊ नयेत हीच या कार्यकर्त्याची अपेक्षा असते. कल्याण कारागृहात न्यायाधिन बंदींची क्षमता ५४० आहे पण सध्या कल्याण कारागृहात बंदींची संख्या ह्यापेक्षा जास्त आहे.

युवा विभागा मध्ये १) स्थानिक २) ग्रामीण ३) परप्रांतीय असे तीन गट आहेत. सदर अशील हे शहरी विभागातून आलेले असून ते भारतीय दंडसंहितेच्या कलम ३७९, ३८० व रेल्वे आवारातील चोरी, या केसमध्ये येतात.

ग्रामीण भागातून कलम ३७९ मध्ये शेतीमध्ये धान्य चोरी, सायकल चोरी, पाण्याची मोटर चोरी, शेळी चोरी तसेच कलम ३०२ च्या केसेसमध्ये येणारे बंदी सुध्दा येतात.

काही बंदी परप्रांतीय असून ते रोजगाराकरिता व काही मुंबईच्या आकर्षणामुळे येथे येतात. वाईट संगतीमुळे किंवा मालकाने पगार न दिल्यामुळे त्याच्या हातून गुन्हा घडला जातो. पण यापैकी बरेचसे शिक्षा घेऊन केस संपवतात व जेव्हा कारागृहातून सुटतात तेव्हा ते आपल्या गावी परत जातात.

▪ **निरीक्षण:**

गृहभेट केल्यानंतर त्यांच्या घरची परिस्थिती पाहिली जाते. काही परिवारामध्ये वडील किंवा मोठा भाऊ नसल्यामुळे, काहींचे आई वडील नसल्यामुळे त्या मुलांवर लक्ष ठेवण्यास कोणीही नसते. त्यामुळे ती मुले वाईट संगतीमुळे त्यांच्याकडून गुन्हा घडला जातो. काही मुलांचे आई वडील असून त्यांच्यावरील अती कडक शिस्तीमुळे ती मुले वाईट मार्गाला जातात.

कारागृह आकडेवारी:

| अ. क्र. | तपशील | मुंबई सेंट्रल कारागृह | भायखळा जिल्हा कारागृह | | ठाणे मध्यवर्ती कारागृह | कल्याण जिल्हा कारागृह | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| | | पुरुष | पुरुष | महिला | पुरुष | पुरुष | महिला |
| १. | एकूण केसेस | ९७ | ७२ | ४० | ३५ | ७० | ७८ |
| २. | गृहभेटी | १९ | ४२ | २९ | २२ | ८० | ५७ |
| ३. | पोलीस स्टेशन भेटी | २ | ७ | ६ | — | ७ | ५ |
| ४. | स्वयंसेवी संस्था भेटी | २ | — | ६ | ४ | — | ३३ |
| ५. | कायदेशीर मदत | ४८ | ३ | — | — | ११ | — |
| ६. | न्यायालय भेटी | ५ | १२ | ८ | १० | २० | ३३ |
| ७. | रुग्णालयाकडे पाठपुरावा भेटी | १ | — | ३ | — | — | २ |
| ८. | अशीलांच्या कुटुंबाला तात्काळ किंवा दिर्घकालीन आर्थिक मदत | १ | ८ | — | २६ | २७ | — |
| ९. | सुधारगृहास भेटी (बंदींच्या मुलांबाबतीत पाठपुरावाकरिता) | ६ | — | २ | — | — | — |
| १०. | महानगरपालिका कार्यालयांना भेटी (कारागृहात जन्म झालेल्या मुलांच्या जन्म दाखल्यासंबंधित) | — | — | ६ | — | — | — |

बालवाडी आकडेवारी:

मुंबई सेंट्रल कारागृह:

(ऑक्टोबर २००३ पर्यंत महिला विभाग मुंबई सेंट्रल कारागृहात होता)

| महिना | ०–१ | १–३ | ३–५ | एकूण |
|---|---|---|---|---|
| ऑक्टोबर | ०८ | ११ | ०१ | २० |
| नोव्हेंबर | ०३ | १२ | ०३ | १८ |
| डिसेंबर | ०० | १० | ०६ | १६ |
| जानेवारी | ०१ | ०९ | ०७ | १७ |
| फेब्रुवारी | ०० | १० | ०९ | १९ |
| मार्च | ०० | ०८ | ८ | १६ |

कल्याण जिल्हा कारागृह:

| महिला | एकूण | मुले | मुली | ०–१ | १–३ | ३–५ |
|---|---|---|---|---|---|---|
| एप्रिल | २० | १३ | ७ | २ | १२ | ६ |
| मे | १९ | १२ | ७ | — | १३ | ६ |
| जून | २४ | १६ | ८ | — | १३ | ११ |
| जुलै | २३ | १७ | ६ | १ | १३ | ११ |
| ऑगस्ट | २० | १५ | ५ | — | १० | १० |
| सप्टेंबर | २० | १५ | ५ | — | १० | १० |
| ऑक्टोबर | २५ | १७ | ८ | — | १३ | १२ |
| नोव्हेंबर | २७ | १७ | १० | — | ११ | १६ |
| डिसेंबर | २५ | १४ | ९ | — | १० | १५ |
| जानेवारी | २७ | १६ | ९ | — | ११ | १६ |
| फेब्रुवारी | १९ | १५ | ४ | — | ९ | १० |
| मार्च | १२ | ८ | ४ | — | ७ | ५ |

# ९. विधी सेवा

- **मुंबई जिल्हा विधी सेवा अधिकारी यांच्याबरोबर समन्वयः**

कारागृहामध्ये गरीब आणि गरजू न्यायाधीन बंदींकरिता त्यांचे न्यायव्यवस्थेत बाजू मांडण्याकरिता वकील असावा. हा हक्क त्यांना मिळावा म्हणून प्रयासच्या वतीने मोफत कायदा सल्ला व सेवा पुरविण्यात येते. मुंबई आणि ठाणे महानगर दंडाधिकारी आणि सत्र न्यायालयातील संपर्कातील वकीलांच्या माध्यमातून ही सेवा, तत्काळ निर्माण झालेल्या गरजेला प्रतिक्रिया म्हणून आणि राज्य विधी सेवा योजनेच्या निराशाजनक कार्यामुळे सुरु झाले होते. मागील काही वर्षातील जाणीवपूर्वक आणि सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे सरकारी विधी सेवा कार्यान्वित करण्यात प्रयासला यश मिळाले आहे. संस्थेचा कार्यकर्ता मुंबई जिल्हा विधी सेवा समितीमध्ये सदस्य म्हणून कार्यरत असून न्यायाधीन बंदींच्या कायदेविषयक समस्या आणि त्यावर उपाय वेळोवेळी सुचवित असतात. प्रयासचे कार्यकर्ते मुं.जि.वि.से. समितीच्या कार्यक्रमांमध्ये सहभागी असतात. त्याव्दारे अपनालय संस्थेच्या वतीने शिवाजीनगर येथे वस्तीपातळीवर कायदेविषयक जाणीव जागृती कार्यक्रम केला व विविध महानगर दंडाधिकारी न्यायालयांमध्ये लोकन्यायालयकरिता समिती सदस्य म्हणून सहभागी असतात.

- **इंडिया सेंटर फॉर ह्युमन राईटस् लॉ (ICHRL) या संस्थेबरोबर समन्वयः**

उपरोक्त प्रयत्नांबरोबरच न्यायाधीन बंदी आणि इतर गरजू व्यक्तींचे मानवी हक्कांचे संरक्षण व्हावे या हेतूने ICHRL (जी संस्था मोफत कायदे सल्ला आणि सेवा महाराष्ट्र आणि देशाच्या इतर भागातील गरजू व्यक्तींना मदत करते) यांच्याबरोबर समन्वयित कार्याचे नियोजन करण्यात आले आहे. प्रयासचे कारागृहात काम करणारे कार्यकर्ते अशा गरजू व्यक्तींना शोधून ICHRL कडे कायदेविषयक सेवा आणि सल्ल्याकरिता पाठवितात. या कामाकरिता तसेच बंदींकरिता अर्ज लिहिण्यासाठी ICHRL च्या वतीने एक पूर्ण वेळ पॅरा लिगल कार्यकर्ता नेमण्यात आला आहे.

या समन्वयामुळे प्रयास कार्यकर्त्यांवरील विधी सेवा पुरविण्याचा भार कमी झालेला आहे. त्यामुळे कार्यकर्ते बदींचे व्यक्तिमत्व, समुपदेशन आणि पुनर्वसन यावर अधिक परिणामकारक काम करु शकतील.

- **शासकीय विधी महाविद्यालयाबरोबर समन्वयः**

शासकीय विधी महाविद्यालयाच्या कायदे मार्गदर्शन प्रकल्पाचे हे चौथे वर्ष आहे. कारागृह विभाग, प्रयास आणि विद्यार्थी यांच्या समन्वयातून भायखळा व मुंबई मध्यवर्ती कारागृहामध्ये हा प्रकल्प राबविण्यात येत आहे. आजपर्यंत साधारण ४५० अर्ज या विद्यार्थ्यांनी बंद्यांकरिता पुढील कारणांकरिता लिहिले आहे. जामीन मिळणे, जामीनाची

रक्कम कमी करणे, वैयक्तिक जामीन आणि गुन्हा कबूल करणे इ. काही अर्जांचा पाठपुरावा न्यायालयांमध्ये या विद्यार्थ्यांनी केला आहे. यांपैकी ७० टक्के अर्जांवर न्यायालयाने सकारात्मक मार्गदर्शन केले आहे.

- **महाराष्ट्र राज्य विधी सहाय्य आणि सल्ला (MSLAAR) नियम, १९८१ च्या नियम ३२ मध्ये बदल:**

(MSLAAR) नियम ३२ नुसार किमान ५ वर्षे अनुभव असलेल्या कार्यरत वकीलांना शासनाच्या मोफत कायदा सहाय्य योजना समितीचे सदस्यत्व देण्यात येत होते. कारागृह, पोलीस कोठडी आणि बालगृह येथे नियमित भेटी देऊन तेथील बंदींना कायदेविषयक सल्ला देणे, अर्ज लिहिण्याकरिता डयुटी कौंसिल नेमण्यात येतात. परंतु असे दिसून येते की ५ वर्षे अनुभव असलेले वकील अशा कामाकरिता फारच कमी प्रमाणात उपलब्ध होतात. तसेच डयुटी कौंसिलचे कार्य करण्याकरिता ५ वर्षे किंवा अधिक अनुभवाची आवश्यकता नसते तेच काम पॅरा लिगल कार्यकर्ता किंवा विधी विद्यालयाचे वरिष्ठ विद्यार्थीदेखील करु शकतात.

माननीय उच्च न्यायालयाच्या आदेशाने १९९४ सालापासून गठीत करण्यात आलेल्या राज्य आंतर विभागीय समितीमध्ये प्रयासच्या वतीने असे सूचित करण्यात आले की, उपरोक्त डयुटी कौंसिल नियुक्त करण्याबाबतच्या नियम ३२ (MSLAAR) मध्ये सुधारणा करण्यात यावी आणि नवोदित विधी पदवीधर वकीलास डयुटी कौंसिल म्हणून मान्यता देण्यात यावी. सदर सूचना नोव्हेंबर २००३ मध्ये झालेल्या बैठकीत सविस्तर चर्चेअंती मान्य करण्यात आली. प्रयास सदर निर्णयाचा कायदा विधी आणि न्याय विभाग, मंत्रालय यांचे बरोबर पाठपुरावा करीत आहे.

- **वैयक्तिक जामीन बंधपत्रावर सुटका झालेल्या न्यायाधीन बंद्यांचा अभ्यास:**

माननीय लोकायुक्त, महाराष्ट्र यांच्या विनंतीवरुन कारागृहात होणाऱ्या गर्दीवर परिणामकारक उपाय शोधण्याचा एक भाग म्हणून वैयक्तिक जामीन बंधपत्रावर सुटका झालेल्या न्यायाधीन बंद्याचा अभ्यास करुन त्याची परिणामकारकता तपासण्यात आली. त्यामध्ये पोलीस अधिकारी आणि सरकारी अभियोक्ता तसेच काही मा. न्यायाधीश आणि नामांकित वकील यांचेबरोबर चर्चा करण्यात आली. सदर अभ्यास मुंबई आणि अहमदनगर जिल्ह्यामध्ये (ग्रामीण परिस्थिती समजण्याकरिता) करण्यात आला.

सदर अभ्यासातून कायदेविषयक तरतूद आणि वास्तव यामध्ये असणाऱ्या त्रुटी तसेच त्याच्या अंमलबजावणीमध्ये येणाऱ्या अडचणी याबाबत अधिक माहिती मिळाली. त्याचा उपयोग फौजदारी प्रक्रिया कायद्याच्या कलमामध्ये आवश्यक बदल किंवा सुधारणा करता येतील का? याचा अभ्यास सुरु आहे.

▪ **अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा, १९८६**

अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्याच्या अंमलबजावणीमध्ये न्यायव्यवस्थेच्या प्रशासनास येणाऱ्या विविध अडचणीं समजून घेण्यासाठी अभ्यास करण्यात आला. सदर अभ्यास प्रक्रियेत शहरी आणि ग्रामीण भागातील पोलीस अधिकारी आणि मा. न्यायाधीशांच्या मुलाखती घेऊन त्यांची भूमिका समजून घेण्यात आली. या अभ्यासाचा उपयोग पुढे राष्ट्रीय पातळीवरील कार्यशाळेत करण्यात आला. अनैतिक व्यापार संबंधित कायदे या विषयावर राष्ट्रीय मानवाधिकार आयोग आणि प्रयास यांच्या समन्वयातून २७ व २८ फेब्रुवारी २००४ रोजी ही कार्यशाळा बोलावण्यात आली. विविध कायद्यांतर्गत असणाऱ्या तरतुदी, मा. सर्वोच्च आणि उच्च न्यायालयांचे कायद्यासंदर्भातील आदेश, मा. दंडाधिकारी आणि पोलीस अधिकारी यांचे कायद्याच्या अंमलबजावणीत प्रत्यक्ष अनुभव कथन याचा या चर्चासत्रात विषयांबाबत उपाय आणि सूचना प्रस्तावित करण्याकरिता चांगला उपयोग झाला.

उदा. कायद्याचे कलम ७ आणि ८ (सार्वजनिक ठिकाणी ग्राहक आकृष्ट करणाऱ्या महिलांवर करण्यात येणारी कारवाई) सदर कलम कायद्यातून काढावे का? याबाबत चर्चा करण्यात आली. महिला व बालविकास विभाग, भारत सरकारने तयार केलेल्या प्रस्तावित धोरणात असे म्हटले आहे की, जर हे कलम काढले तरी शासनाकडून इतर कायद्यांच्या कलमांची (मुंबई पोलीस अधिनियम कलम ११०, मुंबई रेल्वे पोलीस कायदा कलम १४५, भारतीय दंड संविधान कलम २९४) अंमलबजावणी योग्यप्रकारे होत नसल्यामुळे महिलांना अडचणी निर्माण होतात. त्यापेक्षा अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायदा कलम ७ आणि ८ प्रमाणे कारवाई केल्यास महिलेला शोषित महिला म्हणून सुधारगृहात किंवा संरक्षणगृहात पाठविता येते. त्याचप्रमाणे कलम ८ नुसार ग्राहकाविरोधात कारवाई करता येते हे एकमेव कायद्यातील कलम जे ग्राहकाविरोधात आहेत तर ग्राहकाविरोधात कोणतीच कारवाई करण्यात येणार नाही. कलम १० (अ) नुसार कारवाई केल्यास कारागृहात पाठविण्यापेक्षा महिलेला पुनर्वसन केंद्रात पाठविता येईल.

तसेच या अभ्यासातून असे दिसून येते की सदर कायद्यात पुनर्वसनाच्या दृष्टीने फारच कमी तरतुदी आहेत त्यामुळे सदर कायद्यामध्ये सुटका करण्यात आलेल्या महिला (Rescued ) आणि अनैतिक मानवी वाहतूक (Trafficking) यांबाबत सविस्तर व्याख्या करण्याची आवश्यकता आहे. सदर कायद्याला अनुसरुन राज्य नियमावलीमध्ये अद्यापही बदल केलेला दिसून येत नाही, १९८६ च्या सिता कायद्यानुसारच अंमलबजावणी करण्यात येत आहे. अशाप्रकारच्या अनेक तरतुदींची शिफारस या कार्यशाळेनंतर तयार करण्यात आलेल्या अहवालात केली आहे.

## ६. पोलीस ठाणे

- **पोलीस ठाणे आणि फलाटावरील निरीक्षण फेरी:**

रेल्वे स्थानक जेथे देशाच्या विविध राज्यातून गाडया येत असतात, येथे विविध कारणांमुळे लोक घर सोडून किंवा घराबाहेर निराश्रीत स्थितीत येवून पोहचतात. प्रामुख्याने लहान मुले, मुली आणि महिला यांचे प्रमाण लक्षवेधी आहे. निराधार स्थितीमधील या गटातील व्यक्तीची विक्री व शोषण होण्याची दाट शक्यता असते. या व्यक्तींना समाजातील अपप्रवृत्तीपासून दूर ठेवणे, त्यांचे संरक्षण करणे किंवा त्यांना त्यांच्या पालकांकडे परत पाठविणे असे उद्दिष्ट ठेवून छत्रपती शिवाजी रेल्वे पोलीस ठाण्यामध्ये प्रयासने कार्य सुरु केले आहे.

उपरोक्त निराधार गटांपैकी अल्पवयीन मुलांच्याबरोबर तसेच व्यसनाधीनतेकडे जाणाऱ्या मुलांबरोबर काम करण्याऱ्या विविध संस्था आहेत. परंतु गुन्हेगारी, वेश्यावृत्तीकडे जाणाऱ्या व्यक्तींबरोबर कार्य करणारे तसेच त्यांच्या शोषणाविरुध्द कार्य करणारे गट तेथे कार्यरत नाहीत. त्यामुळे अशा प्रकारच्या बळावणाऱ्या अपप्रवृत्तीसंबंधीत कार्य करणे आवश्यक असल्याची गरज आणि हे कार्य करण्याकरिता प्रशिक्षित सामाजिक कार्यकर्त्याची गरज असल्याचे न्यायव्यवस्थेस तसेच शासन व्यवस्थेस दाखवून देणे हे एक उद्दिष्ट ठेवून कार्य सुरु आहे.

सामाजिक कार्यकर्ती स्टेशनच्या आसपास राहणाऱ्या मुलींच्या गटांबरोबर काम करीत आहे. या गटातील महिला स्वतः भीक मागणे किंवा मुलाना या व्यवसायात किंवा वेश्याव्यवसायात गुंतवणे अशा प्रकारचे काम करीत आहेत. एक शंका अशी आहे की काही महिला स्वतः सुध्दा वेश्याव्यवसायात सामील असाव्यात. ही लोकसंख्या फिरती/अस्थिर असल्याने त्यांच्याबरोबर नियमित संपर्क ठेवणे कठीण आहे. तसेच घरातून पळून आलेल्या मुलींच्या केसेस जास्त आहेत सामाजिक कार्यकर्तीचा जास्तीत जास्त वेळ रेल्वे स्टेशनच्या आसपास, गृहभेटी आणि सस्थांना भेटी या कामात जात आहे. काही मानसिक त्रस्त आणि वेश्या व्यवसायातून सुटून आलेल्या स्त्रियांना/मुलींना पोलीसांच्या सुरक्षा व्यवस्थेने रुग्णालयात दाखल केले जाते.

- **छत्रपती शिवाजी रेल्वे पोलीस ठाणेमधील उपक्रम:**

अ) पोलीस ठाणेबरोबर नियमित संपर्क ठेवणे.
ब) पोलीस व कार्यकर्ती यांची फलाटावर संयुक्त निरीक्षण फेरी करणे.
क) नवीन मिळून आलेल्या मुली व महिलांना प्रयासच्या उपक्रमाची माहिती देणे व कार्यशाळा दाखविण्याकरिता आणणे.

ड) या गटाचा नियमितपणा राखण्यासाठी खेळ, रंगकाम, गोष्टी, चर्चा इत्यादी उपक्रम चालविले जाते.

इ) मुली/महिला यांना रस्त्यावरील अनुभवांव्यतिरिक्त संरक्षित वातावरणाची आवड निर्माण व्हावी, वेगळया जगाची माहिती व्हावी यासाठी किमान वर्षातून दोनवेळा सहल आयोजित केली जाते.

- **निरीक्षण:**

१. ज्या मुली/महिला पळून आलेल्या आहेत त्यांचा कार्यकर्तीवर त्वरित विश्वास बसत नाही कारण त्यांनी पोलीस स्टेशनचे तसेच बाहेरील फसवणूक करणारे वातावरण पाहिलेले असते. त्यांचे पोलीसांबाबतीत नकारार्थी अनुभव किंवा माहिती होती. पण काही केसेसमध्ये जेव्हा मुलींना ओळखपत्र दाखविले जाते तेव्हा त्या मुली त्यांच्या बरोबर बोलायला सुरुवात करतात.

२. काही मुली/महिला वेश्याव्यवसायातून सुटलेल्या किंवा पळून आलेल्या ज्या निवासी संस्थामध्ये राहण्यास तयार नसतात, तर त्या लवकरात लवकर घरी जाण्यास इच्छितात. रस्त्यावरील गट, त्यांच्या विविध सवयी आणि बंद निवासी संस्थांमधील नियम व शिस्तीचे वातावरण यामुळे संस्थेमध्ये राहण्यास तयार नाही. परंतु नवीन मुली त्यांच्या कितीही समस्या असल्यातरी त्या निवासी संस्थामध्ये राहण्यास तयार होतात.

# ७. पुनर्वसन

❖ पुरुष विभाग

प्रयासच्या मागील १४ वर्षांच्या पुनर्वसन कार्याचा आढावा घेतल्यास, आपल्या असे लक्षात येईल की पुनर्वसन ही एक दीर्घकालीन प्रक्रिया आहे. याप्रक्रियेत विविध कार्यक्रम अंतर्भूत असून पुनर्वसनाचे विविध पैलू आणि प्रक्रियेकरिता आवश्यक कार्यक्रम हे परस्परावलंबी आहेत. या युनिटमध्ये येणारे सदस्य हे कारागृहातून मुक्त झालेले बंदी, पोलीस ठाण्यातून संदर्भ घेऊन आलेले सदस्य आणि समाजातून प्रयासला ओळखणाऱ्या लोकांनी पाठविलेले सदस्य अशा सर्व व्यक्तींबरोबर संस्था कार्य करीत आहे. त्यामुळे प्रयासमध्ये येणाऱ्या प्रत्येक व्यक्तींचे व्यक्तिमत्व त्यांच्या भूतकाळातील अनुभवांवर अवलंबून असते. त्याच्या व्यक्तीमत्वाची जडणघडण ही त्याप्रमाणेच झालेली असते. त्यामुळे गुन्हेगारीकडे ही व्यक्ती का वळली हे जाणून घेणे आवश्यक ठरते. त्यांची कौटुंबिक स्थिती, समाजातील स्थान, मानसिक स्थिती त्यांचे शिक्षण, मिळालेली संगत या सर्व बाबींचा समावेश त्याच्या जडणघडणीत होत असतो. अशा सर्व वातावरणाचा पगडा असलेल्या व्यक्तीला त्यातून बाहेर काढणे सहज शक्य होत नसते. या क्षेत्रातून बाहेर पडण्याकरिता व्यक्तीला खंबीर आधाराची तसेच त्याला समजून घेणाऱ्या व्यक्तीची आवश्यकता असते. अशा परिस्थितीत त्याची मानसिक स्थिती अतिशय संवदेनशील आणि संमिश्र भावनांनी संभ्रमित झालेली असते. राग, चीड, सूड, अविश्वास, भिती, निराशा यामुळे व्यक्ती सावध परंतु घाई गडबडीमध्ये बरेचदा चुकीचे निर्णय घेतो आणि अडचणीत सापडतो. अशा व्यक्तीला मार्गदर्शन करणे, समुपदेशन करणे आणि समाजाच्या मुख्यप्रवाहापर्यंत आणणे हे अतिशय जिकरीचे कार्य आहे.

▪ ध्येय:

संस्थेचे कार्य हे अशा एका गटाबरोबर सुरु आहे जो गट समाजापासून विन्मुखलेला आहे. समाजाबद्दल चिड, शासन व्यवस्थेबाबत सुडाची भावना मनात ठेऊन हा गट समाजामध्ये त्यास बहिष्कृत जीवन जगावे लागते. परिणामत: दादागिरी करुन किंवा ओरबाडून जगण्याची जीवनशैली निर्माण होते. त्यामुळे समाज स्वास्थ कायदा सुव्यवस्थेलाच धोका निर्माण होतो. प्रयासची भूमिका अशी आहे की कोणत्याही गुन्हेगारी प्रवृत्तीला उत्तेजन न देता कायदेशीर बाबी पूर्ण झाल्यावर त्या व्यक्तीला समाजामध्ये पुन्हा जीवन जगण्याची संधी निर्माण करणे. सदर व्यक्ती समाजाभिमुख, कायद्याचे पालन करुन शांततेने आणि स्वाभिमानाने समाजात पुन्हा उभा राहणे हे प्रयासच्या पुनर्वसन प्रक्रियेचे ध्येय आहे. महाराष्ट्रातील "न्यायव्यवस्था" संवेदनशील आणि पुरोगामी विचारांची असल्यामुळे सरकारच्या विविध खात्यातून मुख्यत्वे गृहखाते (पोलीस, कारागृह विभाग) या खात्यांकडून मिळणाऱ्या प्रतिसादामुळे प्रयासचे हे कार्य

मूर्त स्वरुप घेत आहे. प्रयासच्या दृष्टीने या युवकांना सर्वसामान्य युवक म्हणून विकास प्रक्रियेत सामावून घ्यावे, यादृष्टीने योजना आणि धोरण बनविताना या युवकांच्या समस्या, त्यांचे व्यक्तिमत्त्व, कौशल्य, त्यांच्या कमजोरी व आत्मविश्वासाचे मुद्दे याचा विचार करुन कार्यक्रमांची आखणी करण्यात यावी. प्रयासचा ठाम विश्वास आहे की या युवकांकडे कला कौशल्य क्षमता आहे आणि या गुणांना वाव देऊन त्यांचा आत्मसन्मान, आत्मविश्वास उंचावून त्यांचे धैर्य वाढवण्याची आवश्यकता आहे.

सदर पुनर्वसन प्रक्रियेत अडथळे आणणारे काही घटके पुढीलप्रमाणे आहेत.

१. कौटुंबिक स्थितीमधील तणाव
२. शिक्षण आणि कौशल्यांचा अभाव
३. सवयी आणि नशा
४. सामाजिक दबाव—मैत्री

वरील अडथळे दूर करुन व्यवस्थित पुनर्वसन होण्याकरिता प्रयासच्यावतीने योजनाबध्द कार्यक्रम राबविले जातात. त्यामुळे व्यक्तीच्या आपत्कालीन स्थितीमध्ये सुधारणा होऊन, व्यक्तीची प्रशिक्षण किंवा नोकरी मिळविण्याची मानसिक तयारी होते.

- **प्रयासच्या वतीने पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवा:**
- **परिवार संपर्क आणि समुपदेशन**

कारागृहामध्ये कार्य करीत असताना प्रामुख्याने दोन गट निदर्शनास येतात त्यापैकी एक—जो स्थानिक आहे, या गटातील युवकांचे परिवार स्थानिक पातळीवर मिळू शकतात. तर दुसरा गट जो स्थलांतरित आहे. परिवारापासून आणि कोणत्याही सामाजिक निर्बंधापासून दूर आहे. जे स्थानिक युवक आहेत त्यांच्या केसमध्ये काम करताना त्यांना परिवाराकडून निवारा उपलब्ध होतो. त्यांचे नियमित सहकार्य व पुनर्वसन प्रक्रियेत सक्रीय सहभाग उपलब्ध होतो. अशावेळी परिवाराशी संबंधित कार्यावर अधिक भर दिला जातो. आणि व्यक्तीला परिवाराबरोबर जोडणे हे एक मुख्य कार्य बनते. जेथे त्याला बहुमूल्य आपुलकी मिळते. स्थलांतरित व्यक्ती संदर्भात कार्य करताना त्यांच्या निवाऱ्याच्या व्यवस्थेपासून कार्य सुरु होते. त्याच्या मूलभूत गरजा पूर्ण केल्यावर त्याच्या स्वावलंबनाकडे लक्ष पुरविले जाते.

- **कौशल्य प्रशिक्षण:**

कारागृहात येण्यापूर्वी व्यक्तीने उपजिविकेकरिता काहीतरी काम केलेले असते. जुजबी कौशल्य मिळविलेले असते. या कौशल्यांना प्रशिक्षणाची जोड देऊन ते अधिक कार्यक्षम बनविण्याचे कार्य प्रयास करते. या प्रशिक्षणाचा विषय व्यक्तीची आवड व पुनर्वसन तसेच भविष्यकालीन योजनेचा विचार करुन ठरविले जातात. यावर्षी प्रयासच्या चार अशीलांनी वाहन चालकाचे प्रशिक्षण मुंबई महानगर पालिकेच्या सुवर्ण जयंती शहरी योजनेतून घेतले आहे. त्यापैकी एका व्यक्तीला टॅक्सी चालक परवाना मिळाला आहे. मागील वर्षापर्यंत प्रयास अशिलाला विविध प्रशिक्षणामध्ये पाठवित

असे. परंतु यावर्षी पासून प्रशिक्षणाचे विषय बदलून सामाजिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या विविध संस्था संघटनामध्ये सामाजिक कार्यातील आवश्यक भुमिका मिळविण्यासाठीचे प्रशिक्षणाकरिता पाठवित आहोत.

- शिक्षण:

वाचन आणि लेखन ही संस्थेकडे येणाऱ्या व्यक्तींची सर्वात मोठी अडचण आहे. शिक्षण नसल्यामुळे समाजातील स्पर्धेला ते सामोरे जाऊ शकत नाहीत. सदर अडचण लक्षात घेऊन प्रयासने त्यांच्या करिता किमान साक्षरता कार्यक्रम आखण्याचे ठरविले आहे. तसेच ज्यांचे शिक्षण अपूर्ण राहिले आहे. अशा लोकांकरिता मुक्त विद्यापीठीमार्फत पुन्हा शिक्षणाच्या प्रवाहात आणण्याविषयी प्रयत्न सुरु आहेत. काही युवकांकरिता इंग्रजी बोलण्याच्या वर्गाचे आयोजन करण्यात येत आहे.

- **वैद्यकीय मदत:**

प्रयासमध्ये येणाऱ्या व्यक्तींपैकी काही व्यक्ती किंवा त्यांच्या परिवारातील सदस्य आजारी असल्यास कुटुंबामध्ये तणाव निर्माण होतो. आर्थिक स्थिती नाजूक असल्यामुळे उपचार घेण्यामध्ये दिरंगाई होते. ती व्यक्ती जर कमवणारी असेल तर आर्थिक संकटाला तोंड द्यावे लागते. बहुतांशी आजार हे नैराश्यातून किंवा सवयी व नशेमुळे निर्माण झालेले आढळतात. प्रामुख्याने काही मानसिक आजार आहेत तर क्षय आणि एचआयव्ही सारख्या भयंकर व्याधी देखील आहेत. अशावेळी वैद्यकीय उपचार, सकस आहार, नियमित पाठपुरावा इत्यादी सेवांचा त्यात समावेश आहे. मागील वर्षात चार व्यक्ती क्षयरोगाकरिता उपचार घेत आहेत.

- क्षमता वृध्दी कार्यक्रम:

व्यक्तीच्या विविध क्षमतांचा विकास साधण्याच्या दृष्टीने प्रयासने काही उपक्रम हाती घ्यायचे ठरविले आहे. त्याप्रक्रियेचा एक भाग म्हणजे अभ्यास सहली, विविध क्षेत्रात कार्य करणाऱ्या संस्थांमध्ये प्रयास आपल्या अशीलांना अभ्यास भेटींकरिता घेऊन जाते. सदरभेटीमध्ये संस्थेचे कार्य, विविध उपक्रम त्यांचे अशील यांची भेट घेऊन सविस्तर चर्चा घेतली जाते. या भेटीमधून प्रेरणा घेऊन लोक विविध विषयामध्ये प्रशिक्षण घेणे. याविषयी सकारात्मक चर्चा होते. आणि समाजामध्ये घडणाऱ्या परिवर्तनाची माहिती होते. **"एखादी गोष्ट शक्य आहे"** याची खात्री पटते आणि आपणही काही तरी करुन करु शकतो याची जाणीव होते.

- **कार्यकर्ता अनुभव प्रशिक्षण कार्यक्रम:**

आर्थिक पुनर्वसनाचा एकभाग म्हणून पूर्वी प्रयासच्या वतीने काम शोधून युवकांना विविध क्षेत्रात कामाला ठेवण्याचा उपक्रम प्रयासतर्फे राबविण्यात येत होता. परंतु आर्थिक नफा आणि उत्पादन हे मुख्य उद्दिष्ट असणाऱ्या उद्योजकांकडे सामाजिक बांधिलकी म्हणून पुनर्वसन प्रक्रियेत भाग घेण्याची इच्छा आहे परंतु व्यावसायिक स्पर्धेमुळे व्यक्तींच्या वैयक्तिक अडचणींमुळे लक्ष द्यायला त्यांना वेळ नसतो. अशा

परिस्थितीत एक कमी आत्मविश्वास असलेल्या व्यक्तीला स्पर्धेच्या वातावरणात टिकणे सहज शक्य होत नाही. त्यामुळे नैमित्तिक रजा, उशिरा जाणे, उत्पादनाच्या गुणवत्तेमध्ये होणारी घसरण यामुळे स्पर्धेमधून गळतीचे प्रमाण अधिक होते. अर्थात यामध्ये काही अपवादात्मक उदाहरणे आहेत जेथे व्यक्तींनी मिळालेल्या संधीचा उत्तम तऱ्हेने उपयोग करुन आपले आयुष्य उभारण्यात यश मिळविले आहे. परंतु जे लोक स्पर्धेमध्ये टिकले नाहीत त्यांच्याकरिता पर्याय शोधण आवश्यक होते.

प्रयासकडे नियमित संपर्कात असलेल्या काही व्यक्तींना सामाजिक कार्यात विशेष रस दाखवित होत्या. या गोष्टींला आधारभूत मानून थोडे विश्लेषण केल्यावर जाणवले की सामाजिक क्षेत्राकडे लोक का वळत असावेत? या क्षेत्रात त्यांना समानतेची वागणूक हा नियम नाही हे प्रमेय आहे. ज्या विभागात ते राहतात त्या विभागात थोडे नाव मिळते. पाप पुण्यांच्या संकल्पनेवर विश्वास असणाऱ्यांना पुण्य करण्याची संधी मिळते. नवीन विषय शिकायला मिळतात, नवीन ओळखी होतात. पोलीसांच्या संकल्पनेतले चांगले काम मिळते. उदरनिर्वाह चालतो. उपरोक्त बाबी लक्षात घेऊन प्रयासने या संकल्पनेस मूर्त स्वरुप देण्याचे ठरविले.

स्वयंसेवक अनुभव प्रशिक्षण कार्यक्रमांतर्गत व्यक्तीला स्वयंसेवी संस्थेमध्ये प्रशिक्षणार्थी म्हणून पाठविले जाते त्यावेळी प्रामुख्याने पुढील तीन मुद्यांवर भर दिला जातो.

१. व्यक्तीचे व्यक्तिमत्व आणि संस्थेची कार्यपध्दती विषय हे जुळून येणे.
२. संस्थेमध्ये अशी एक अनुभवी व्यक्ती मिळावी जी या नव्याने येणाऱ्या व्यक्तीला समजून घेईल आणि एक कार्यकर्ता म्हणून त्या व्यक्तीच्या विकासात मार्गदर्शक म्हणून भूमिका बजावेल.
३. वरील सर्व बाबींचा नियमित पाठपुरावा करता येईल जेणेकरुन त्या व्यक्तीच्या व्यक्तिमत्वाच्या प्रगतीचा नियमित आढावा घेता यावा.

या प्रक्रियेत प्रामुख्याने पुढील बाबींवर विशेष भर दिला जातो. या व्यक्तीला कामाची सवय व्हावी. नियमितपणा अंगी बाणावा, या उद्दिष्टाने हा कार्यक्रम राबविण्यात येत आहे.

अ) शिस्त: नियमितपणा, प्रामाणिकपणा, दिलेले काम पूर्णत्वास नेणे, नेतृत्व मान्य करणे, सूचना अंमलात आणणे इत्यादी.

ब) सामाजिक व संवाद कौशल्ये: संस्थेमध्ये कार्यरत असलेल्या इतर कार्यकर्त्यांबरोबर व संस्था कार्य करीत असलेल्या अशीलांबरोबर व्यवस्थित नातेसंबंध, विनम्रता आणि आदरयुक्त सुसंवाद प्रस्थापित करणे.

क) कार्यकुशलता: कामातील कौशल्य आत्मसात करणे. अडचणीतील व्यक्तीला समजून घेणे.

ड) माहिती: संस्था करीत असलेल्या कार्याचा विषय व्यवस्थित समजून घेणे, त्याबाबत वाचन वाढविणे, अशा प्रकारचे कार्य करणाऱ्या इतर संस्थांची माहिती घेणे. इ.

❖ महिला विभाग:
कारागृहातून बाहेर येणाऱ्या, पोलीस स्टेशन मधून येणाऱ्या, कोणी नातेवाईक कारागृहात आहेत अशा, वस्तीतून किंवा संस्थानी पाठवलेल्या समस्याग्रस्त महिलांबरोबर प्रयास पुनर्वसनाचे कार्य करते. महिलांचे पुनर्वसन ही एक मोठी प्रक्रिया आहे.

या वर्षात एकूण ३३ महिला पुनर्वसनाच्या प्रक्रियेत होत्या. या महिलांना प्रयास कडून मदत मिळाली. प्रत्येकीच्या मदतीचे स्वरुप वेगवेगळे होते. काही महिलांना संस्थेत प्रवेश, घरासाठी मदत, मुलांना शाळेत किंवा संस्थेत प्रवेश, त्यांची फी, वह्या–पुस्तकाची मदत, पोलीस ठाणेची मदत, न्यायालयीन केसेस संदर्भात, महिला रुग्णालयात असताना किंवा त्यांचे नातेवाईक रुग्णालयात असताना त्यांना औषधोपचाराकरिता मदत दिली जाते. या सर्व बाबींमधून एखादी गोष्ट मिळाली की पुनर्वसन झाले असे म्हणता येईल का? या सर्व गोष्टींची मदत म्हणजेच पुनर्वसनाची प्रक्रिया सुरु होते.

पुनर्वसनाच्या प्रक्रियेत कोणत्याही व्यक्तीला राहण्यासाठी घर तसेच कुटुंबाची व समाजाची साथ मिळणे जरुरीचे असते तसेच आर्थिक दृष्टया स्थिर करणे गरजेचे असते. प्रयासने अशा प्रकारे त्यांची गरज पुरी करण्याचा प्रयत्न केला. या महिलांसाठी मुंबई सेंट्रल येथे कार्यशाळा आहे. या महिलांना तेथे प्रशिक्षण दिले जाते या महिलांमध्ये कोणती कला आहे, त्याची पारख करुन त्यांना दुसऱ्या ठिकाणी पुढील प्रशिक्षण घेण्यासाठी पाठवले जाते. या प्रशिक्षणानुसार काम पाहून या महिलेची आर्थिक बाजू मजबूत करण्याचा प्रयत्न केला जातो.

महिलांना खाजगी क्षेत्रात कामाला पाठवले असता तिथे बऱ्याच समस्या येत होत्या. कामाच्या ठिकाणी वेळेवर न जाणे, त्याच्या नियमानुसार न वागणे, मालक या महिलांना समजून घेत नव्हते. त्यामुळे कोणत्याही एका नोकरीमध्ये दिर्घकाळ टिकत नव्हत्या. या सर्व बाबींचा विचार करुन प्रयासने नवीन योजना आखली. या महिलांना खाजगी क्षेत्रात कामाला न पाठवता त्यांची कोणत्या गोष्टीत आवड आहे. तिच्या जवळ कोणती कला आहे त्यांचे ती प्रशिक्षण घेऊ शकेल का? व त्या प्रशिक्षणाचा उपयोग काम मिळणेसाठी होईल का? या महिलांना कोण समजून घेईल? या गोष्टींचा विचार करुन त्यांना काही स्वयंसेवी संस्थेत काम मिळण्याच्या उद्देशाने चर्चा केली व त्यांना या महिलांच्या वरील अडचणी समजावून सांगितल्या, स्वयंसेवी संस्था हे सामाजिक कार्यक्षेत्र असल्यामुळे या महिलांना समजून घेऊन त्यांच्यात हळूहळू बदल घडवू शकेल या दृष्टीने काही संस्था तयार झाल्या. मानसिक व आर्थिक दृष्टया ह्या महिला स्थिर होतील यासाठी प्रयासने या महिलांना स्वयंसेवी संस्थेत प्रशिक्षणासाठी दाखल केले. या नवीन योजनेचा महिलांना चांगला फायदा होत आहे.

काही महिला वस्तीमध्ये भाडयाने घर घेऊन राहतात व त्यांना मुंबई सेंट्रल कार्यशाळेत जाणे येणे लांब पडते. तर काही महिला रेल्वे पोलीसांच्या केसेस मध्ये अडकल्या असल्यामुळे त्या महिला रेल्वेने प्रवास करु शकत नाहीत. अशा महिलांच्या प्रशिक्षणासाठी प्रयासने त्या महिलांच्या जवळच्या वस्तीत एखादी स्वयंसेवी संस्था पाहून तिथे त्यांचे प्रशिक्षण केले आहे. जेणेकरुन या महिलाना त्या संस्थेत प्रशिक्षण मिळावे व त्या प्रशिक्षणाचा फायदा काम मिळण्यासाठी व्हावा.

या महिलांची जीवनशैली फार वेगळी आहे. रोज कमवायचे रोज खर्च करायचे, कमाई कमी खर्च जास्त, या सवई मुळे या महिलाना पैसे खर्च करणे माहित आहे परंतु पैसे जमा करणे माहित नाही. भविष्याचा बिल्कुल विचार नाही. पैसे कसे जमा करावेत, कुठे करावेत यांची माहिती नाही. या महिलांना त्यांच्या जवळच्या बँकेत जावून तेथील व्यवस्थापकाला भेटून प्रयास संस्थेची माहिती देवून प्रयासच्या आधारे त्या महिलांचे बँकेचे खाते सुरु करुन दिल्यावर त्या महिला आपले पैसे बँकेच्या खात्यात जमा करु लागल्या.

## पुनर्वसन आकडेवारी (मुंबई आणि ठाणे जिल्हा)

पुरुष अशील

| अ.क्र. | तपशील | एकूण |
|---|---|---|
| १. | जुन्या पुनर्वसन केसेसमधील कार्य | २५ |
| २. | कारागृह, पोलीस ठाणे संस्था आणि वस्तीतून आलेल्या नवीन केसेस | ३६ |
| ३. | गृहभेटी | ४१ |
| ४. | पोलीस स्टेशन भेटी | १७ |
| ५. | न्यायालय भेटी | १६ |
| ६. | शैक्षणिक भेटी | १२ |
| ७. | संस्था भेटी | ८१ |
| ८. | संस्था कार्यानुभव | ४६ |
| ९. | प्रशिक्षण केंद्रांना भेटी | ०५ |
| १०. | बाहेरील संस्थेत प्रशिक्षण | ०७ |
| ११. | सुवर्ण जयंती योजनेतील प्रशिक्षणार्थी | ०२ |
| १२. | वैद्यकीय मदत | १६ |
| १३. | प्रयास ओळखपत्र | ०२ |
| १४. | घरभाडे, अनामत रक्कम, निवासी संस्थेची फी | ०६ |
| १५. | लघुउद्योग सुरु करण्यासाठी आर्थिक मदत | ०४ |
| १६. | व्यवसाय सुरु करण्यासाठी कच्चा माल खरेदी करण्याकरिता आर्थिक मदत | १६ |
| १७. | मूळगावी परत जाण्याकरिता मदत | ०४ |
| १८. | शैक्षणिक मदत | ०४ |

महिला अशील

| अ.क्र. | तपशील | एकूण |
|---|---|---|
| १. | एकूण केसेस | ८७ |
| २. | दिर्घकालीन कार्य झालेल्या केसेस | ४६ |
| ३. | पुनर्वसन झालेल्या केसेस | १० |
| ४. | गृहभेटी | ९४ |
| ५. | स्वयंसेवी संस्थांना भेटी | ४४ |
| ६. | पोलीस ठाणे भेटी | ११ |
| ७. | न्यायालय भेटी | १० |
| ८. | रुग्णालय भेटी | १९ |
| ९. | शाळा भेटी | ०५ |
| १०. | स्वयंसेवी संस्थेत कार्यानुभव | १५ |
| ११. | घर दुरुस्ती/अनामत रक्कम/तात्काळ आर्थिक मदत | ०६ |

# ८. शोषित महिला व मुलींचे पुनर्वसन

❖ **शासकीय संरक्षण गृहः**

वेश्यावृत्तीमधून आणि बारमध्ये छापा टाकून पोलीसांव्दारे सोडविलेल्या मुली/महिलांना, त्यांनी पुन्हा त्याच व्यवसायात जावे लागू नये म्हणून त्यांना शासकीय संरक्षण गृहात ठेवले जाते. त्यांचे व्यवस्थित पुनर्वसन व्हावे म्हणून प्रयासच्या वतीने विविध कार्यक्रम आणि उपक्रम राबविले जातात.

- **समुपदेशनः**

प्रयासची कार्यकर्ती मुली/महिलांना त्यांच्या भविष्यातील समस्यांना सामोरे जाऊन त्या सोडविण्याकरिता सक्षम बनविणे करिता समुपदेशन करते. ज्या मुली/महिला आपल्या कुटुंबाबरोबर राहू इच्छितात, त्यांच्या कुटुंबाबरोबर चर्चा करतें. आणि त्यांच्यातील मतभेद दूर करुन नाते वाढविण्याचा प्रयत्न करते. त्यांची कलाकौशल्य, क्षमता आणि आत्मविश्वास लक्षात घेऊन संस्थेतून सुटल्यानंतर भविष्यकालीन योजनेची मांडणी करण्यात येते.

संरक्षण गृहातील अशील ही आपल्या कुटुंबाकडे किंवा तिच्या गावी जाण्याच्या आशेत असते. पण काही अपरिहार्य कारणामुळे त्या आपल्या घरी जाऊ शकत नाही. सामाजिक कार्यकर्ती त्यांच्या राहण्यासाठी विविध महिला सहाय्यक संस्थेत निवाऱ्याची सोय करण्याचा प्रयत्न करते.

- **गृहभेटीः**

न्यायाधीन प्रक्रियेतून सुटलेल्या मुंबईत राहणाऱ्या स्त्रियांच्या घरी त्यांच्या विनंतीनुसार गृहभेट केली जाते. त्यांच्या घरच्या परिस्थितीचा आढावा घेऊन त्यांच्या कुटुंबाला त्या मुलीच्या परिस्थितीची माहिती देण्यात येते. त्यावरुन ही व्यक्ती आपल्या घरी परत जाऊ शकते का याचा आढावा घेतला जातो. त्याप्रमाणे पुढील नियोजन केले जाते.

- **वैद्यकीय मदतः**

प्रयासच्या निरीक्षणात आलेल्या काही महिलांमध्ये मानसिक आजाराची लक्षणे दिसून आली. त्यांच्याकरिता मानसरोगतज्ञ व्यक्तीकडून सल्ला घेतला आणि आवश्यक वैद्यकीय उपचार मिळवून दिले.

- **उपक्रमः**

संस्थेच्या शिक्षिकेच्या सहकार्याने प्रशिक्षण उपक्रम सुरु केले. अशीलांचे संस्थेत प्रवेश झाल्यानंतर ते लगेचच प्रशिक्षण घेण्यास तयार नव्हते, त्यांच्याशी बोलून नातेसंबंध सुधारुन त्यांना प्रशिक्षणाकरिता उत्तेजित करण्यात आले. सुरुवातीला त्यांना आवडेल

असे उपक्रम राबविले. उदा. मेहंदी डिझाईन, ब्युटी केअर, एम्बोस्ड पेंटींग, ग्लास पेंटीग, हॅंगिंग, फुले बनविणे, कापड पेंटींग, सॉफ्ट टॉईज, लोकरीच्या वस्तू, रुमाल बनविणे, मेणबत्ती बनविणे इत्यादी. शिवणकाम शिकवताना प्रयास त्यांना शिवणकामाचे साहित्य पुरविते, शिवणकामात साडी पेटीकोट शिवणे, ड्रेस पेटीकोट शिवणे, ब्लाऊज इत्यादी बनविलेल्या वस्तू त्यांना प्रयासतर्फे दिले जातात.

- **इतर उपक्रमः**

गांधी जयंती आणि गणेशोत्सवः संरक्षण गृह कर्मचारी आणि इतरांच्या मदतीने तेथे गांधी जयंती आणि गणेशोत्सव साजरे केले गेले. मनोरंजनासाठी हिंदी फिल्म आणि गाण्याच्या केसेट दिल्या गेल्या.

- **प्रशासनः**

माझगाव न्यायालय आणि गिरगाव न्यायालय येथील दंडाधिकारी यांच्याबरोबर खालील बाबतील बैठका घेण्यात आल्या.

अ) संस्थेतील कामाबाबत माहिती आणि व्यक्तीच्या पुनर्वसनाच्या वैयक्तिक आखणीबाबत चर्चा केली.

ब) गरजेनुसार न्यायालयाला भेट देणे. उदा. संस्थेतील अशील जी संरक्षण गृहात आहे ती मुंबईत राहू इच्छिते आणि तिला प्रशिक्षणाची आवड होती. पण नियमानुसार संस्थेबाहेर जाऊन नव्हते पण आता ते शक्य झाले आहे. प्रयासने तिच्या पुढच्या मदतीची आणि तिच्या पुढच्या मुंबईतील राहण्याची आणि बाहेरील प्रशिक्षणाची जबाबदारी घेतली. प्रयासने मासिक प्रगती अहवाल मिळण्याची विनंती केली होती.

- **भविष्यातील योजनाः**

प्रयासचे निवारा घर नसल्यामुळे अशीलांचे सुधारगृहातून कायदेशीर जबाबदारी घेण्याच्या परिस्थितीत नाही. परंतु जे मुंबईत राहण्यास तयार आहेत, त्यांना प्रयास प्रशिक्षण आणि निवारा देण्याची व्यवस्था करते. प्रयासने इतर निवारा घरांशी चर्चा करुन सुधारगृहाच्या मुलींना निवाऱ्याची सोय करते.

- **कार्यजाळेः**

प्रयास ज्यांना राहत्या घरी परतायचे आहे. त्यांना त्यांच्या राज्यातील स्थानिक स्वयंसेवी संस्थांना संपर्क करुन त्यांच्याकडे केस पाठविते. प्रयास अशा संस्थांना निवडते की ज्या संस्था महिलांच्या समस्यांबाबत काम करतात, त्यांचे समुपदेशनाचे काम करतात, प्रशिक्षण, निवारा, नोकरी, इ. बाबतीत परिचित असतील. कुटुंबांचा शोध घेण्यासाठी आणि महिलेला कुटुंबात सामावून घेण्याकरिता पोलीस, शासकीय अधिकारी म्हणजे जिल्हाधिकारी, जिल्हा महिला व बाल कल्याण अधिकारी इ. मदत घेतली जाते.

| अ.क्र. | तपशील | एकूण |
|---|---|---|
| १. | चालू केसेस | ०३ |
| २. | नवीन केसेस | ०८ |

| अ.क्र. | तपशील | एकूण |
|---|---|---|
| १. | | ०५ |
| २. | कुटुंबाचा शोध घेणे | ०२ |
| ३. | नवीन स्वयंसेवी संस्थांचा शोध घेणे | ०२ |
| ४. | मूळगावी परत पाठविण्यास मदत | ०२ |
| ५. | अशीलांना संस्थेत पाठविणे | ०१ |
| ६. | अशीलांना कुटुंबाकडे पाठविणे | ०२ |
| ७. | बाहेरील राज्यात गृहभेटी | ०१ |

| अ.क्र. | तपशील | एकूण |
|---|---|---|
| १. | पश्चिम बंगाल | ०१ |
| २. | महाराष्ट्र | ०१ |
| ३. | कर्नाटक | ०१ |
| ४. | उत्तर प्रदेश | ०२ |
| ५. | गुजरात | ०१ |
| ६. | गोवा | ०१ |
| ७. | राजस्थान | ०१ |
| ८. | बिहार | ०१ |

❖ कार्यक्रम आणि पुनर्वसन केंद्र, मुंबई सेंट्रल

प्रयासच्या कार्यशाळेला तीन वर्षे पूर्ण झाली, मागील तीन वर्षात कार्यशाळेमध्ये वेगवेगळया पिक–अप पॉईंट (संरक्षण गृह, विशेष बालगृह, विभागातील संस्था, अशीलाच्या संदर्भाने, सी.एस.टी. रेल्वे स्टेशन, कारागृह) मधून महिला/मुली येत होत्या. २००३ ते २००४ या कालावधीमध्ये सी.एस.टी., संरक्षण गृह, व संस्था इथून आलेल्या मुलींचे प्रमाण अधिक आहे. आजवर कार्यशाळेत मुलींना वेगवेगळया प्रकारचे प्रशिक्षण दिले जायचे परंतु संस्था प्रशिक्षण क्षेत्रात मान्यताप्राप्त नसल्यामुळे त्याचे प्रमाणपत्र प्रयास देऊ शकत नव्हते. अशीलासाठी प्रयास हेच प्रशिक्षणाकरिता उपलब्ध वातावरण होते. प्रशिक्षणाच्या पुढची एक पायरी म्हणजे बाहेरील क्षेत्रात जाऊन काम करणे हे अशीलाला जमत नाही. त्यानंतर त्यांचे पुढचे पाऊल म्हणजे प्रत्यक्ष 'काम' आणि 'कामातून मिळणारा पगार' इथे येऊन ती व्यक्ती थांबत होती. बाहेर तिला जे कार्यानुभव मिळायला हवे ते मिळत नव्हते. हा अनुभव लक्षात घेऊन प्रयासने प्रशिक्षण केंद्राचा एक आराखडा तयार केला. ह्यामध्ये ती व्यक्ती प्रशिक्षण विभागातून निघाल्यावर उत्पादन विभागात स्थिर होईपर्यंत कोणकोणती तयारी करुन घ्यायची आहे. त्याकरिता काय करावे लागेल याची आखणी यावर्षी करण्यात आली.

- **मुली/महिला कार्यशाळेत आल्यानंतरचे निरीक्षण :**

कार्यशाळेत आलेल्या महिलेचे पुढील चार मुद्दे लक्षात ठेवून निरीक्षण करणे.

अ) शिस्त
ब) कौशल्य
क) अंतर्गत कला
ड) माहिती (वैयक्तिक/सामान्य)

ती मुलगी वेळेवर येते का? कार्यशाळेत होणाऱ्या शैक्षणिक कार्यक्रमाला उपस्थित राहते का? ते वेळेवर पूर्ण करते की नाही हे तपासले जाते. कोणती कामे ती आवडीने करते. कोणत्या गटाबरोबर ती जुळवून घेऊ शकते. कार्यशाळेत होणारे वेगवेगळे कार्यक्रम त्यामध्ये ती सहभागी होते का? बाहेरील संस्थाभेटीकरिता तयार होते का? किंवा तयार करावे लागते. निवासी संस्था बदलल्यानंतर तिच्यामध्ये काही बदल झाला का? दुसऱ्यांची किंवा स्वत:ची जवाबदारी कितपत घेते. स्वत:हून किती सहभागी होते. स्वत:बद्दल विचार करते का? स्वत:चा वेळ ती आपल्या उद्देशानुसार कामी आणते का? दुसऱ्या शिक्षिका किंवा इतर व्यक्तीशी नाते कसे बनवते. विभागातून ज्या महिला येत आहेत त्याचा घरच्या परिस्थितीमुळे इथल्या कार्यक्रमात अडथळा होतो का? इत्यादीचे निरीक्षण प्रयास कार्यशाळेत केले जाते.

त्यानंतर जर त्या मुलीला प्रशिक्षण घ्यायचे असेल तर बाहेरच्या प्रशिक्षण केंद्रात पाठविणे. प्रशिक्षणाला पाठविण्याआधी एखाद्या संस्थेत तिला दाखल करुन खरोखरच ती हे प्रशिक्षण करु शकते का? यांचे निरीक्षण करणे. जे प्रशिक्षण तिने निवडले आहे त्या प्रशिक्षणाला लक्षात घेऊन कार्यानुभव आणि संस्थाभेटी करणे. प्रशिक्षण कालावधी दरम्यान त्यांना साहित्य, गाडीभाडे, फी ची सुविधा पुरविणे तसेच वेळच्या वेळी विद्यावेतन देण्याचा प्रयत्न करणे. मुलीबरोबर तिला होणाऱ्या समस्या व तिला बोलण्यासाठी उदयुक्त करण्यात येते. मुलींना लक्षात घेऊन वेगवेगळया क्षेत्रीय कार्यकर्त्याबरोबर तसेच विभाग कार्यकर्ता, स्वयंसेवी संस्था कार्यकर्त्याबरोबर बोलणे व पुढची पायरी घेणे.

१. त्यांना किमान तिन महिन्यातुन दोन वेळा प्रशिक्षण केंद्रात भेटीला घेऊन जाणे.
२. तेथे जाण्यासाठी प्रवास कोठून व कसा करावा हे समजावणे.
३. त्यासाठी लागणाऱ्या वेळेचे वेळापत्रक त्यांना समजावून सांगून त्याप्रमाणे व्यवस्थित चालले आहे की नाही ते पाहणे.
४. ज्या मुलीचे प्रशिक्षण पूर्ण झालेले आहे तिला स्वयंसेवी संस्थेत दाखल करणे.
५. ज्या मुलीचे २ ते ३ महिन्यांपर्यंत निरीक्षण झालेले आहे, अशा मुलींना बाहेर प्रशिक्षणासाठी पाठविण्यात आले. मुलींना शिवणकाम, ब्युटीपार्लर, पॅराप्रोफेशनल सोशल वर्क, भरतकाम, इत्यादीसाठी बाहेरच्या प्रशिक्षण केंद्रात प्रवेश घेऊन दिला व त्यानंतर त्याचा पाठपुरावा ठेवला.

६. प्रशिक्षण कालावधीत त्यांना येणाऱ्या (प्रशिक्षण समस्या) बद्दल तेथील कार्यकर्त्यांबरोबर बोलणे.
७. प्रशिक्षण पूर्ण झाल्यावर त्यांना प्रमाणपत्र मिळाले की नाही त्याचा पाठपुरावा ठेवणे.

- कार्यशाळेतील कार्यक्रम:

१. वेगवेगळी कापडी फुले बनविणे.
२. शिवणकामाची पूर्वतयारी करणे. (मशीन चालविणे, धागा लावणे, बॉबीन लावून भरणे, शिवणकामाचा सराव करणे इ.)
३. मुलींना वेगवेगळया कार्यक्रमाव्दारे कार्यानुभव मिळण्यासाठी किंवा त्यांची आवड शोधून काढण्यासाठी विणकाम, फरची खेळणी बनविणे, केशकला, रंगकाम, कागदी खोके बनविणे ह्यासाठी बाहेरुन तज्ञ व्यक्ती बोलविणे.
४. प्रयासच्या आराखडयानुसार मुलीना लिहता वाचता येणे महत्वाचे होते. त्यामुळे ह्यावर्षी 'प्रथम' संस्थेच्या मदतीने प्रयासच्या कार्यशाळेत सकाळच्या ११.०० ते १.३० या वेळेत हा क्लास चालू केला. त्यासाठी बाहेरुन शिक्षिका बोलवून तिला प्रथमने प्रशिक्षण दिले. हा साक्षरता वर्ग सर्वांना बंधनकारक असल्यामुळे सर्व मुली वर्गात सहभागी होतात. ज्या मुली बाहेर प्रशिक्षणासाठी जात आहेत त्याही या साक्षरता वर्गात सहभागी होतात.
५. मुलींची दर सोमवारी बैठक घेतली जाते त्यामध्ये मुलींना होणाऱ्या समस्या, प्रयासला येणारे अडथळे किंवा प्रयासचा कार्यक्रम व्यवस्थित चालविण्यासाठी मुलींच्या सहभागाने काय करता येईल. कार्यशाळेत होणाऱ्या घटना यावर चर्चा केली जाते.

- निरीक्षण:

१. ज्या मुलीचे निरीक्षण कार्यशाळेत झालेले आहे त्यांच्या पुढच्या प्रशिक्षणात जास्त अडचणी येत नाहीत.
२. या बैठकीत मुलींच्या समस्यांबाबत चर्चा करुन, मुलीकडून आलेला पर्याय योग्य असेल तर त्याची अंमलबजावणी व्यवस्थित होते. तसेच, जर एखादी जवाबदारी एका मुलीवर दिली उदा. कार्यशाळेतील कपाटांची निगराणी ठेवणे, उपस्थिती पत्रकांवर नावे टाकून देणे, उपस्थिती लावणे, साफसफाई पाहणे. कुलूप लावणे. वॉवचर कार्यालयात देणे इत्यादी तर त्या व्यवस्थित पार पाडतात.
३. मुलींच्या बैठकीमुळे मुलींमध्ये होणाऱ्या वादाचे प्रमाण कमी झालेले आढळते.
४. ज्या मुलींना प्रशिक्षणासाठी, बाहेर पाठवित आहोत त्यांची बोलण्याच्या पध्दतीत सुधारणा झालेली दिसते. त्यांना स्वत: प्रवास करण्याचा सराव झालेला जाणवतो आहे. प्रशिक्षण साहित्याच्या दुकानांची माहिती मिळालेली दिसते. वेगवेगळया कला त्यांना पाहायला मिळतात त्यामुळे त्यांना चांगला कार्यानुभव मिळत आहे असे दिसून येते.

### कार्यशाळेतील आणि बाहेरील प्रशिक्षण
### आकडेवारी एप्रिल २००३ ते मार्च २००४

| कार्यशाळेतील प्रशिक्षण | एकूण | बाहेरील प्रशिक्षण | एकूण |
|---|---|---|---|
| शिवणकाम | १३ | पॅरा—प्रोफेशनल | ३ |
| विणकाम | ८ | सौंदर्यसाधना | २ |
| कागदी फुले बनविणे | १५ | बालवाडी शिक्षक | १ |
| मेहंदीकाम | ३ | राष्ट्रीय मुक्त शाळा (दहावी) | ४ |
| सुतळीच्या वस्तू | ६ | | |
| साक्षरता | २२ | | |
| खेळणी बनविणे | १६ | | |
| रंगकाम | २ | | |

▪ **स्वयंसेवी संस्थांमध्ये प्रशिक्षण कार्यक्रम:** या वर्षापासून अशीलांना नोकरी मिळावी आणि त्यांना समाजामध्ये समाविष्ट करण्याच्या दृष्टीने काम करण्याचा पुढाकार घेतला. ज्या अशीलांनी मुंबई सेंट्रल येथील कार्यशाळेत प्रशिक्षण घेतले त्यांना नोकरीच्या दृष्टीकोनातून अनुभव मिळण्याकरिता स्वयंसेवी संस्थांमध्ये पाठविले जाते. त्यांकरिता त्यांना रु. ५०/— प्रतिदिन आणि प्रवासखर्च दिला जातो. अशीलांचा आत्मविश्वास वाढावा, त्यांना काम करीत असताना प्रशिक्षण देणे आणि स्वयंसेवी संस्थांमध्ये नोकरी मिळवून देणे हा या उपक्रमाचा उद्देश आहे.

| अ.क्र. | तपशील | एकूण |
|---|---|---|
| १. | स्वयंसेवी संस्थांनमध्ये पाठविलेल्या एकूण मुली | ३० |
| २. | स्वयंसेवी संस्थांमध्ये नियमित जाणाऱ्या मुली | १४ |
| ३. | स्वयंसेवी संस्थामधील कार्यक्रम अर्धवट सोडलेल्या मुली<br>अ) घरगुती कारण : १<br>ब) वैद्यकीय अडचण : १<br>क) स्वगृही परत पाठविली : २<br>ड) कार्यक्रमाशी न जुळल्यामुळे : १ | ५ |
| ४. | स्वयंसेवी संस्थेच्या मदतीने नोकरीसाठी मदत | २ |
| ५. | स्वयंसेवी संस्थांशी संपर्क<br>अ) स्थानिक : ३३<br>ब) बाहेरील : २ | ३५ |
| ६. | स्वयंसेवी संस्थांबरोबर पाठपुरावा | ७५ |
| ७. | अशीलांकरिता शैक्षणिक सहल | १० |
| ८. | स्वयंसेवी संस्था प्रशिक्षणाच्या प्रक्रियेत असणारे अशील<br>अ) कार्यशाळा : ७<br>ब) संरक्षण गृह : १० | १७ |

- **मुंबई सेंट्रल केंद्रातील इतर उपक्रम:**

१. कार्यकर्ता बैठक: केसेस आणि कार्यक्षेत्रातून येणाऱ्या अडचणी याबाबत दर शुक्रवारी बैठकीत चर्चा केली जाते.

२. अशीलांबरोबर बैठक: या बैठकीत प्रशिक्षण, पुनर्वसन इत्यादींबाबत चर्चा केली जाते.

३. अशीलांकरिता शैक्षणिक भेटी:

अ) बँकेतील बचत खात्याच्या फायद्याची माहिती मिळवून घेण्याकरिता

ब) रेशनिंग कृती समितीला भेट

क) पोस्ट कार्यालयातील बचत योजनेची माहिती करण्याकरिता

ड) जागतिक सामाजिक मंच येथे १७ ते २४ फेब्रुवारी मध्ये भेट दिली.

४. फिल्म: ५

५. स्वयंसेवी संस्थांना आणि प्रशिक्षण संस्थांना शैक्षणिक भेट

- **विशेष घटना:**

अ) महिला मेळावा, दसरा उत्सव

ब) नृत्य स्पर्धा,

| अ.क्र. | तपशील | एकूण |
|---|---|---|
| १. | नवीन केसेस | १४ |
| २. | जुन्या केसेस | ७ |
| ३. | संपर्कात नसलेल्या केसेस | ५ |

| अ.क्र. | तपशील | एकूण |
|---|---|---|
| १. | पळून आलेल्या मुली/महिला | १ |
| २. | स्वयंसेवी संस्थांकडून पाठविलेल्या केसेस | १ |
| ३. | शासकीय संरक्षण गृहातून पाठविलेल्या केसेस | ८ |
| ४. | सी.एस.टी. रेल्वे पोलीस स्टेशनमधून पाठविलेल्या केसेस | १४ |
| ५. | न्यायालयाकडून पाठविलेल्या केसेस | ६ |
| ६. | वस्तीतून आलेल्या केसेस | १ |
| ७. | अशीलांच्या संदर्भाने आलेल्या केसेस | २ |

| अ.क्र. | तपशील | एकूण |
|---|---|---|
| १. | स्वयंसेवी संस्थांमध्ये प्रशिक्षण | १३ |
| २. | वैद्यकीय मदत | ६ |
| ३. | व्यवसायभिमुख प्रशिक्षण | १५ |
| ४. | कुटुंबात समाविष्ट | ३ |
| ५. | पुनर्वसन उपक्रम सोडण्याचा अशीलांचा निर्णय | २ |

| अ.क्र. | तपशील | एकूण |
|---|---|---|
| १. | समुपदेशन आणि मदत | २७ |
| २. | संदर्भित<br>अ) कायदेशीर मदत<br>ब) अल्पकालीन निवारा<br>क) व्यवसायभिमुख प्रशिक्षण संस्था<br>ड) स्वयंसेवी संस्थांमध्ये प्रशिक्षण<br>इ) इतर | <br>१<br>२२<br>२६<br>३०<br>४ |
| ३. | आर्थिक मदत<br>अ) औषधोपचार<br>ब) घर घेण्याकरिता अनामत रक्कम<br>क) रेशन | <br>२७<br>—<br>— |

❖ नागरिकता हक्क:

वेश्यावृत्तीमधून मुक्त होणाऱ्या महिलांच्या पुनर्वसनामध्ये विविध अडचणी येत असतात. या महिलांना समाजाच्या मुख्य प्रवाहात समाविष्ट करणे, हे अतिशय आव्हानात्मक कार्य आहे. तत्काळ येणाऱ्या अशीलांना सेवा पुरविणे आणि त्या सेवा त्यांना हक्क म्हणून उपलब्ध व्हाव्यात याकरिता शासकीय पातळीवर धोरणात्मक कार्य करणे. असे दोन टप्प्यांमध्ये प्रयासचे कार्य सुरु आहे.

- ध्येय:

१. अशीलांना त्यांचे नागरिक हक्क मिळवून देणे.

संस्थेचे अशील हे समाजाने बहिष्कृत केलेल्या गटामधील असल्यामुळे त्यांना निवारा, रेशनकार्ड, बचत खाते, मतदानाचा अधिकार इ. गोष्टी सहज मिळत नाहीत. परिणामी पुनर्वसन प्रक्रियेमध्ये अडथळे निर्माण होतात. या गोष्टीचा परिणाम अशीलांवर होऊन त्यांचे मानसिक खच्चीकरण होते. असे होऊ नये व कोणाही व्यक्तीचा माणूस म्हणून जगण्याचा अधिकार त्यांना मिळवून देणे.

प्रक्रिया:

अ) निवारा

ब) रेशनकार्ड

क) बचत खाते

ड) मतदानाचा अधिकार

- प्रयास अशीलांना निवाऱ्यासाठी विविध सरकारी / निमसरकारी / स्वयंसेवी संस्थांमध्ये प्रवेश मिळवून देते. दिवसेंदिवस अशीलांच्या संख्येत होणारी वाढ व मर्यादित संस्था यामुळे काम करताना खूप ताण जाणवत होता.

- जे जुने अशील आहेत किंवा पुनर्वसन प्रक्रियेच्या २—३ टप्प्यात आहेत त्यांना पुन्हा समाजात पाठविणे (सोशल रिइंटिग्रेशन) यासाठी भाडेतत्वावर घर घेवून त्यासाठी अनामत रक्कम प्रयासने दिली आहे.
- जे अशील वस्तीमध्ये घर घेऊन राहत आहेत त्यांच्या समस्या सोडविणे व मार्गदर्शन करणे.
- काही केसेस मध्ये त्यांची वडिलोपार्जित जुनी घरे आहेत. झोपडपट्टी पुनर्वसन योजनेअंतर्गत त्यांना घर मिळवण्यामध्ये काही समस्या आहेत त्या मिटविण्याच्या दृष्टीने मध्यस्थ संस्थेला जाऊन भेटणे, पाठपुरावा करणे, वस्तीमध्ये जाऊन सोसायटीबरोबर बैठक घेतली. त्या बैठकीचा पाठपुरावा चालू आहे.

प्रयास अशीलांसाठी निवारा कसा मिळू शकतो हे पाहण्यासाठी विविध (शासकीय) योजनांचा अभ्यास करुन, परंतु सर्व अटींची पूर्तता होत नसल्यामुळे लागू होत नाही. घर बांधणी प्रकल्प संस्था, म्हाडा, सिडको, हुडको आणि एचडीएफसी यांना भेटी देऊन अशील गटांबाबतीत सविस्तर चर्चा केली. अशीलासाठी आपण काही करु शकतो का? त्यांच्या काही सूचना आहेत का? यावर म्हाडा या संस्थेने मुंबईमध्ये जागा मिळणे मुश्किल आहे असे सांगितले. त्यांनी हुडको कडे पाठविले. हुडको चे काही प्रकल्प मुंबई उपनगर विभागामध्ये आहेत पण त्यांचे बांधकाम चुकीचे व धोकादायक असल्यामुळे विक्री होऊ शकत नाही म्हणुन तर त्या प्रकल्पामधील काही जागा कमी किमतीमध्ये मिळू शकतील असे सांगितले गेले. एचडीएफसी या संस्थेने ग्रुपहोम या संकल्पनेसाठी काही सूचना दिल्या होत्या. अशीलांना घरासाठी कर्ज हवे असेल तर ५०—६० हजार पर्यंत कर्ज देण्याची तयारी दर्शविली अर्थात अशीलांचे अर्थार्जनाचे काही साधन असावे व कमीत कमी २ हजार रुपयांपर्यंत कमाई असणे आवश्यक आहे. प्रयास संस्थेकडून ५—७ अशील एकत्र राहणार असतील तर त्याबद्दल स्वतंत्रपणे चर्चा करता येईल अशा प्रकारच्या उपाय योजनाबाबत विचार करीत आहोत.

माविम या संस्थेने महिलांच्या निवाऱ्याचा प्रश्न सोडविण्यासाठी पुढाकार घेतला. संपूर्ण महाराष्ट्रातून १५ स्वयंसेवी संस्थांना आमंत्रित करण्यात आले होते. सर्वांना या विषयासंबंधी विचारणा झाली होती. सर्वांनी प्रस्ताव व बजेटही दिले होते. त्यांवर चर्चा होऊन सध्या अस्तित्वात असलेल्या (निवारा देणाऱ्या) संस्था व त्या प्रस्तावामध्ये आवश्यक त्या सुधारणा सुचविल्या होत्या. तर नवीन संस्थांसाठी कशा स्वरुपाच्या गृहनिर्माणसंस्था असाव्यात यावर वेळोवेळी चर्चा झाल्या. सर्वसंमतीने प्रस्ताव व बजेट महाराष्ट्र शासनाला पाठविण्यात आले. कालांतराने ही योजना महिला बाल विकास विभागाकडे हस्तांतरित झाली आहे असे समजले.

नवी मुंबईत कार्यरत असणाऱ्या महाराष्ट्र महिला परिषद या संस्थेला भेट दिली. महिलांचे बचतगट स्थापन करुन त्यातून जमलेल्या पैशातून महिलांनी स्वतःचे घर घेतले यांचे उदाहरण या संस्थेकडे आहे. काही खाजगी बांधकाम व्यावसायिकांच्या मदतीने त्यांनी या योजनेला मूर्त स्वरुप दिले आहे.

२. शिधापत्रिका

शिधापत्रिका रहिवासाचा पुरावा मानू नये असे जरी शिधापत्रिकेवरच लिहिलेले असले तरी तसे होत नाही. त्यामुळे शिधापत्रिकेचा मुद्दा नवीन नाही. वेगवेगळया पध्दतीने व ठिकाणी तो सतत अडथळा म्हणून समोर राहिला आहे याला प्रयासचे अशीलही अपवाद नाहीत. लालबत्ती विभागात राहणाऱ्या व वेश्याव्यवसाय करणाऱ्या महिलांसाठी चार वर्षापूर्वीच शासकीय अध्यादेश निघाला आहे. प्रयासचे अशील जरी लालबत्ती विभागातून, घरुन पळून आलेले, रस्त्यावर राहणारे असले तरी ते धंदाघरात राहून धंदा करीत नाहीत. त्यामुळे जेव्हा निरीक्षक तपासणीसाठी येणार तेव्हा मुली तिथे दिसणारच नाहीत. कारण प्रयासचे अशील कुठल्या ना कुठल्या संस्थेत राहतात. त्यामुळे जेव्हा अशील संस्थेत राहून पुन्हा पायावर उभे राहण्याचा प्रयत्न करतात. तेव्हा त्यांचे खच्चीकरण होऊ नये म्हणून त्यांना शिधापत्रिका / अशी पत्रिका ज्याच्यामुळे तिचा रहिवासाचा पुरेसा पुरावा असू शकतो तो मिळावा.

यासाठी सामाजिक कार्यकर्त्यांनी रेशनिंग कृती समितीबरोबर बैठका घेऊन मुद्दा पुढे नेण्यासाठी मदत घेतली. प्रयासच्या अशील गटा सारखाच असणारा गट कोणकोणत्या संस्थेत आहे हे शोधून त्यांनाही या लॉबिंगमध्ये सामिल करुन घेतले. सध्या सी.सी.डी.टी. व साथी मुंबई या दोन संस्था सोबत आहेत.

२३ मार्च २००४ रोजी महाराष्ट्र शासनाचा शिधापत्रिका सदंर्भात निर्णय आला आहे. यामध्ये पिडित महिलांसाठी शिधापत्रिका मिळण्यासाठी अटी शिथिल करण्यात आल्या आहेत. आता अशील ज्या संस्थेमध्ये आहेत त्या विभागातील शिधावाटप कार्यालयामधून विशिष्ट अर्ज भरुन शिधापत्रिका मिळू शकेल.

३. बचत खाते:

प्रयासचे अशील प्रशिक्षणासाठी जेव्हा कार्यशाळेत येतात तेव्हा त्यांना दिवसाला रु. ५०/- याप्रमाणे विद्यावेतन मिळते. बहुतेक अशील विविध संस्थांमध्ये राहत असल्याने त्यांना मिळालेले पैसे बरेचदा सुरक्षित ठेवता येत नाहीत. त्यामुळे अशीलांना मिळालेल सर्व पैसे खर्च करण्यावर भर देतात. बचत करत नाहीत व शेवटी प्रशिक्षण संपल्यानंतर त्यांच्या हातात पैसे नसतात. सतत कोणावर तरी अवलंबून राहण्याची वृत्ती वाढते. तसे होऊ नये व पुनर्वसनाच्या दृष्टीने त्यांनी बचत करावी, समाजासाठी ज्या सोई उपलब्ध आहेत त्याचा फायदा अशीलांनाही घेता यावा. या उद्देशाने प्रयासने अशीलाला बँक खाते उघडून देण्याची कल्पना पुढे आली.

सध्या प्रयास अशीलाचे स्टेट बँक ऑफ इंडिया, बँक ऑफ महाराष्ट्र या बँकामध्ये खाते उघडले आहे. गेल्या वर्षामध्ये एकूण १३ अशीलांचे खाते उघडले आहे. त्यासाठी प्रयासचे पत्र देणे गरजेचे असते. बँक कर्मचाऱ्यांचे सहकार्य चांगले मिळत आहे. विभागातील इतर संस्थांनाही याचा फायदा होत आहे.

- पोस्ट बचत खाते:

  अशीलांसाठी पोस्टाच्या बचत खाते योजनेची माहिती देण्याकरिता पोस्टमास्तरांना आमंत्रित केले होते. योजनेची सविस्तर माहिती घेतल्यावर अशीलाला काय फायदा होऊ शकेल हे पाहिले. पोस्ट बचत खात्यामध्ये व्याजदर कमी आहे परंतु केंद्र सरकारची योजना असल्याने फायदा होणार आहे. अशील विविध प्रांतातून येतात व जातातही असे जे अशील आहेत त्यांच्यासाठी ते ज्या प्रांतात परत जातील तेथील पोस्ट कार्यालयात ते वापरु शकतात.

  पोस्ट कार्यालयात कामकाज व इतर योजना समजून घेण्यासाठी पोस्ट कार्यालय भेट आयोजित केली होती. २० अशील भेटीसाठी गेले होते. मनिऑर्डर कशी करतात? पत्र--येतात--जातात ते कसे? पार्सल कशी पाठविली जातात? हे सगळे विचारुन माहीत करुन घेताना अशीलांची उत्सुकता दिसून आली.

  **स्वयंसहाय्यता बचत गट:**

  ही संकल्पना अशीलांना समजण्यासाठी एक चर्चा सत्र आयोजित केले होते. अशीलांना ज्या शंका होत्या त्याचे निरसन केले. अशीलांना संकल्पना आवडली व ती त्यांनी सुरु केली आहे. त्याचे नियोजन आणि पाठपुरावा अशील आणि कार्यकर्ते मिळून करत आहेत. परंतु अजून गटाचे खाते बँकेमध्ये चालू केले नाही. ठोस नियम झाल्यानंतर व गटाबद्दल आत्मविश्वास मिळाल्यानंतर हे होऊ शकेल.

४. पुढील योजना:

- मतदानाचा अधिकार:

  भारताच्या १८ वर्षे पूर्ण असलेल्या प्रत्येक नागरिकाला मतदानाचा अधिकार घटनेने दिलेला आहे. बरेच लोक त्यापासून वंचित आहेत. अशीलसुध्दा त्यांच्यापैकी एक आहेत. त्यांना हा अधिकार प्राप्त झाला पाहिजे ते मिळविण्यासाठी काय समस्या आहेत? ते पाहणे व मतदानाचा अधिकार प्राप्त करुन देण्यासाठी प्रयत्न करत आहे.

- जीवन बिमा निगम:

  या योजनेच्या अशीलांना फायदा मिळावा म्हणून सविस्तर अभ्यास सुरु असून काही अशीलांना त्याचा लाभ घेता येईल. असे प्रयत्न सुरु आहे.

# ९. संशोधन आणि माहिती संकलन

संस्थेच्या वतीने पुरविण्यात येणाऱ्या विविध सेवांमध्ये अधिक कार्यक्षमता आणि कार्यतत्परता येण्याकरिता तसेच सेवा पुरविण्याबाबतची सुसूत्रता आणण्याकरिता नव्याने आखणी करण्यात आली. त्यानुसार उपरोक्त विविध सेवांप्रमाणेच स्वयंसेवी संस्था संघटनांमध्ये विविध कार्यभूमिका शिकण्याकरिता प्रशिक्षण मिळावे, तसेच व्यक्तीला प्रयास व्यतिरिक्त वातावरण व लोक यांच्याशी संपर्क यावा व तेथे या व्यक्तीमध्ये होणारे बदल व वातावरणावर होणारा या व्यक्तीचा परिणाम याबाबत निरीक्षण करण्यास वाव मिळावा यादृष्टीने या कार्यक्रमाची आखणी करण्यात आली. सदर कार्यक्रमामध्ये होणारे बदल, चढ–उतार व इतर प्रगती व अडचणी याचे निरीक्षण आणि प्रत्यक्ष भेटी व चर्चेव्दारे माहिती संकलन करणे. त्याचे विश्लेषण करुन आवश्यकतेनुसार नवीन कार्यक्रमाची आखणी करणे हे प्रमुख कार्य या विभागाकरिता आखले आहे. प्रामुख्याने मुली आणि महिलांना देण्यात येणाऱ्या सेवांचे मूल्यांकन आणि पाठपुरावा करण्यावर या विभागाचा भर आहे.

**स्वयंसेवी संस्था प्रशिक्षण कार्यक्रमाबाबतचे काही मुद्दे:**

१. बाहेरच्या संस्था संघटनांमधील कार्यकर्त्यांचा विकास हा शिक्षण प्रशिक्षणावर आधारीत आहे हे लक्षात आल्यावर मुली व महिला पुढील शिक्षण व प्रशिक्षणाकरिता तयार झाल्याचे दिसून येते.

२. व्यक्तीमध्ये जबाबदारीची जाणीव जागृत झाल्याचे आढळते.

३. या प्रशिक्षणार्थींना काही संस्था कार्यकर्त्या म्हणून आपल्या संस्थेत सामावून घेण्याच्या विचारात आहेत.

४. प्लेसमेंट कार्यक्रम केवळ क्षमता आणि कौशल्य विकासापुरता मर्यादित न राहता या कार्यक्रमाव्दारे झालेल्या ओळखींमुळे व्यक्तीचे व्यक्तीगत अडचणी दूर करण्याकरिता उदा. वैद्यकीय सेवा, निवारा, मुलांच्या शिक्षणाची सुविधा इत्यादी पूर्ण करण्याकरिता सहकार्य मिळवितात.

५. ज्या मुली व महिला व्यवसाय प्रशिक्षण घेऊ इच्छित नाहीत. परंतु त्यांना लग्न करुन स्थिर व्हायचे आहे. अशा मुली महिला या कार्यक्रमामध्ये फार काळ टिकत नाहीत.

६. या प्रशिक्षण कार्यक्रमाव्दारे व्यक्तीची ओळख केवळ गुन्हेगारी किंवा वेश्यावृत्तीमधून बाहेर आलेली अशी न राहता ती अधिकाधिक संस्थांच्या माध्यमातून विस्तारित जाते आणि जन सामान्यांमध्ये मिसळून जाते.

७. स्वयंसेवी संस्था मधील हे कार्य आणि वाढणाऱ्या मुलींची (केसेस) ची संख्या लक्षात घेता केवळ एक कार्यकर्ता या प्रक्रियेकरिता पुरेसा नाही असे लक्षात येते.

८. संस्थेची आर्थिक स्थिती लक्षात घेता सदर कार्यक्रमाचे सातत्य टिकवणे कठीण वाटते.

कार्यक्षेत्रातील सद्यस्थिती लक्षात ठेवून कार्यक्रमामध्ये अंमलबजावणीबाबत धोरणांमध्ये प्रत्यक्षात आणता येतील असे बदल सुचविण्यात आले. वेश्यावृत्तीतून सोडवून आणलेल्या तसेच सोडून आलेल्या महिला यांचेबरोबर कार्य करण्याकरिता विशिष्ट पध्दती अंगिकारण्याची आवश्यकता आहे आणि त्या विकसित करण्याची आवश्यकता आहे.

कार्यक्रम अंमलबजावणीमध्ये क्षेत्र कार्यकर्त्यांचे अनुभव लक्षात घेता व्यक्तीला पुनर्वसनाबाबत विचार करायला आणि कार्यक्रमाला प्रतिसाद देण्याकरिता आधी समस्याग्रस्त वातावरणातून बाहेर यायला हवे. सदर प्रक्रियेतून कार्यक्रमामध्ये असलेल्या त्रुटी दूर करुन त्यावर पर्याय शोधण्याकरिता जाणीवपूर्वक प्रयत्न करावे लागतात.

त्याकरिता खालील काही प्रमुख बाबी पूर्ण करणे महत्वाचे वाटते.

- गुन्हेगारी आणि वेश्यावृत्तीबाबत संवेदनशील व्यक्तीच्या पुनर्वसनाबाबत उपलब्ध माहितीचे सविस्तर संकलन करणे.
- पूर्वी लिहिले गेलेले सर्व दस्तऐवज तपासून पाहणे व त्याची सद्यस्थितीबरोबर तुलना करुन ते लागू होते का ते पाहणे.
- कार्यक्षत्रात कार्य करण्याकरिता कार्यकर्त्याकरिता कार्यप्रणाली तयार करणे. जे नवीन व्यक्ती अथवा संस्था या क्षेत्रात कार्य करताना त्यांना उपयुक्त ठरावे.
- गुन्हेगारी आणि वेश्यावृत्तीत येणाऱ्या व्यक्तीच्या पुनर्वसनाबाबत विविध संशोधन/अभ्यास हाती घेणे.
- संस्थेचे कार्य, धोरणे आणि कार्यपध्दतीमध्ये वेळोवेळी सुधारणा करण्याकरिता लहान अभ्यास अंगिकारणे.
- माहिती संकलन करुन विविध अधिकाऱ्यांपुढे प्रश्नाचे गांभिर्य मांडणीकरिता अहवाल तयार करणे.
- अन्य उपलब्ध माहिती संकलन आणि संशोधन करणाऱ्या व्यक्ती आणि संस्थाबरोबर जोडून घेवून विषयाची व्याप्ती समजून घेणे आणि वाढविण्याकरिता प्रयत्न करणे.
- संस्थेने निर्माण केलेल्या दस्तऐवजाच्यामार्फत, संस्थेकरिता संसाधने उपलब्ध करता येतील का याचा विचार करणे.

पुढील वर्षभरात संरचना व्यवस्थित बसवून कार्यक्षेत्रात येणाऱ्या अडचणी दूर करण्यावर भर देण्यात येणार आहे.

# १०. भरुच विभाग (गुजरात)

मागील वर्षापेक्षा ह्या वर्षी भरुच विभागामध्ये काही महत्वाच्या घटना घडल्या आहेत. गेल्यावर्षी मद्याच्या बेकायदेशीर व्यवसायात असणाऱ्या मुली व महिलांकरिता कसिया गाव, ता. अंकलेश्वर, जि. भरुच येथे प्रशिक्षण केंद्र सुरु केले होते. भरुच विभागाने वेश्याव्यवसाय, गुन्हेगारी आणि निराधार महिला व मुलींच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने काम सुरु केले आहे.

❖ कसिया गावातील प्रशिक्षण केंद्र:
प्रयासने कसिया गावातील बेकायदा मद्य व्यवसाय करणाऱ्या महिलांच्या मुलींबरोबर काम करण्याचा पुढाकार घेतला. त्यांच्याकडून चांगला प्रतिसाद होता. सरासरी १० मुली नियमित केंद्रात उपस्थित राहत. खरं म्हणजे या मुलींच्या माध्यमातून त्यांच्या मातांना संपर्क करणे हे या कार्यक्रमाचे प्रमुख उद्दिष्ट होते. वर्ग सुरु झाल्यावर या माता उत्सुकता म्हणून वर्गाला भेट देत असत आणि त्या कार्यकर्तीबरोबर जवळीक साधून त्यांच्या व्यक्तिगत आणि व्यवसाय संबंधी समस्यांबाबत चर्चा करत असत. याच विभागातील तरुण मुले प्रशिक्षण आणि नोकरी संदर्भात प्रयासशी संपर्क साधू लागले होते.
या कालावधीत प्रयासने गावातील काही समस्यांचा आढावा घेतला.

- नशा करणारे पुरुष आणि स्त्रियांचे प्रमाण अधिक आहे.
- फक्त शेतीच्या दिवसात कामधंदा उपलब्ध असतो.
- तरुणांमध्ये बेरोजगारी प्रमाण अधिक आहे.
- तरुणांमधील शिक्षणाचे प्रमाण कमी आहे.
- मुले, तरुण, आणि महिला त्यांचा रिकामा वेळ जुगार खेळण्यात घालवतात.
- दारुबंदी कायदा आणि त्यांचे अधिकार याबाबत अपुरी माहिती
- पोलीस, वकील यांच्याकडून होणारी फसवूणक इ.

वरील मुद्दे प्रकर्षाने समोर येत असले तरीही मुली नियमित प्रशिक्षणाला येत होत्या. अनुपस्थितीचे काही कारण असेल तर ते वरीलपैकी काहीतरी असायचे. नंतर प्रयासने प्रशिक्षणानंतर अर्थार्जनाच्या दृष्टीने काम करण्यास सुरुवात केली.

गावातील संपूर्ण समाज वरील समस्यांचा सामना करीत आहे. तरीही प्रयास वरील समस्यांबाबतीत अभ्यास करुन त्याबाबतीत उपाय करण्याचा प्रयत्न करीत आहे.

- प्रयासने प्रशिक्षण कार्यक्रम राबविण्याकरिता जनशिक्षण संस्थान संस्थेशी संपर्क साधला. काही बैठकी झाल्यानंतर संस्थेच्या अधिकाऱ्याने कसिया गावात भेट देऊन तेथील तरुणांशी चर्चा केली. त्या बैठकीत प्रशिक्षण कार्यक्रमासाठी अर्ज करण्यात आला आणि प्रशिक्षण सुरु करण्याकरिता थोडा वेळ लागणार होता. परंतु, त्या प्रक्रियेकरिता युवक वाट बघण्यास तयार नव्हते.

- दारुबंदी कायदा आणि त्याबाबतीत व्यक्तींचे हक्क समजावण्याकरिता कायदेविषयक जाणीव जागृती कार्यक्रम राबविण्याकरिता प्रयासने जिल्हा कायदा सहाय्यक समितीशी संपर्क साधला. परंतु, केवळ दारुबंदी कायद्यावर कार्यक्रम घेण्यास त्यांनी असमर्थता दर्शविली.
- गटातील काही मुलींना शिवणकाम आणि भरतकामाचे पुढील प्रशिक्षण घेण्याकरिता भरुचमध्ये येण्याकरिता प्रोत्साहित केले. परंतु, मुलींचे पालक विशेषत: त्यांचे वडील मुलींना गावाबाहेर पाठविण्यास तयार नव्हते.
- प्रशिक्षणार्थी मुलींच्या मातांशी सदर प्रशिक्षण कार्यक्रम मुलींच्या अर्थार्जनाच्या दृष्टीने कसा राबविता येईल याबाबत चर्चा करण्यात आली.

एका कार्यकर्त्याने विविध मुद्दयांवर काम करणे अतिशय कठीण वाटते. सप्टेंबर महिन्यांत म्हणजेच शेती कामाच्या मौसमात, मुली केंद्रात न येता त्या मजूरी करुन दिवसाचे पैसे कमविणे पसंत करत होत्या. सध्या प्रयासने कसिया गावातील प्रशिक्षणाचे काम तात्पुरते बंद केले आहे.

प्रयासने विभागातील पेप्सीको कंपनीच्या व्यवस्थापनाशी चर्चा करुन बेरोजगारीचे रुपांतर गुन्ह्यामध्ये होत असल्याबाबतचे प्रक्रिया समजावून सांगितली. पेप्सीको कंपनीने विभागातील काही तरुणांसाठी नोकरीची संधी देण्यास तयारी दर्शविली. प्रयासचे कार्यकर्ते कसिया गावात गेले आणि त्यांनी तेथील तरुणांशी त्या संधी बाबतीत चर्चा केली. पुढे पेप्सीको कंपनीबरोबर बैठकी करण्यात आल्या आणि त्यांना कसिया गावामध्ये मुलाखती घेण्यास विनंती केली, जेणेकरुन जास्तीत जास्त प्रतिनिधी मुलाखतीसाठी उपस्थित राहू शकतील. कंपनीच्या मनुष्यबळ अधिकाऱ्याने भेट देऊन मुलीखती घेतल्या. परिणामत: ९ तरुणांना त्या कंपनीमध्ये नोकरी मिळाली.

### ❖ अंकलेश्वर रेल्वे स्टेशन:

अंकलेश्वर हे देशातील एक महत्वपूर्ण औद्योगिक शहर आहे. हा विभाग देशातील इतर भागातील बेरोजगार तरुणांना काम करण्यासाठी आकर्षित करतो. पोलीस स्टेशन आणि कारागृहात काम करत असताना असे दिसून आले की स्टेशनवर असणाऱ्या निराधार महिला व मुली ह्या गुन्हा आणि वेश्याव्यवसायाकडे संवेदनशील आहेत. ते पोलीसांच्या जाळयात अडकण्याची शक्यता आहे.

*काही पडताळणी:*

- निरनिराळया राज्यातून पळून आलेले युवक अंकलेश्वर स्टेशनवर पोहचतात.
- अंकलेश्वरला आलेले युवक नोकरीच्या शोधात असतात.
- तरुण मुली आणि महिला ज्या घरातून पळून आलेल्या असतात त्या सुध्दा अंकलेश्वर स्टेशनवर पोहचतात.
- शाळेत जाणारी मुले आणि मुली स्टेशनच्या आसपास फिरत असतात.
- मनोरुग्ण मुलांना पोलीस पकडून घेऊन जातात.

- मनोरुग्ण मुली स्टेशनजवळ फिरत असतात. त्यांचा लैंगिक छळ केला जातो.
- स्टेशनवर असणाऱ्या निराधार महिला वेश्याव्यवसायाकडे संवेदनशील असतात.
- काही महिला स्टेशनवर ग्राहक आकर्षित करण्याच्या केसमध्ये आढळतात.

प्रयासचे कार्यकर्ते भरुच आणि अंकलेश्वर रेल्वे पोलीस अधिकाऱ्यांना भेटले. तेथील स्टेशन अधिक्षक आणि तिकिट तपासनीस यांच्याबरोबर एक बैठक घेतली. त्यांनी प्रयासची निरीक्षणे लक्षात घेऊन सामाजिक कार्यकर्ता रेल्वे पोलीस स्टेशनमध्ये असणे जरुरी आहे हा मुद्दा स्वीकारला. त्यानुसार प्रायोगिक तत्वावर कार्यकर्तीची नेमणूक करण्यात आली.

❖ अंकलेश्वर उप—कारागृह:—

अंकलेश्वर येथे अंकलेश्वर उप—कारागृह (न्यायालयीन कोठडी) सुरु झाली आहे, तेथे अंकलेश्वर आणि हंसोट तालुक्यातील कच्चे कैदी आहेत. हंसोट हा सामाजिक आणि आर्थिक· दृष्टया दुर्बल विभाग असून तेथील युवक लहान—सहान· गुन्ह्यामध्ये अटक होतात. या गटाबरोबर काम सुरु करण्याचा विचार आहे.

भरुच उप—कारागृह आणि भरुच पोलीस स्टेशनचे काम पाहिल्यानंतर जिल्हाधिकाऱ्याने अंकलेश्वर उप—कारागृहात काम करण्याची परवानगी दिली. एक कार्यकर्ती आठवडयातून एकदा तपासणीकरिता अंकलेश्वर कारागृहाला भेट देत असे. महत्वाचे काम म्हणजे निराधार अशीलांना कायदेविषयक मदत करणे. सध्या, कारागृहामध्ये महिला कायकर्ती नियुक्तीस असल्यामुळे ती चर्चेकरिता बॅरेकमध्ये जाऊ शकत नाही. त्यामुळे पुरेसे पुनर्वसनाचे काम होत नाही.

❖ भरुच उप—कारागृह:

- पुरुष विभाग:

भरुच उप—कारागृहातील बंदींची संख्या २५० ते २७५ आहे. कार्यकर्तीचे काम खालीलप्रमाणे:

१. कारागृहातील बंदी आणि त्यांच्या कुटुंबांशी संपर्क साधणे
२. बंदींना आणि त्यांच्या कुटुंबांना कायदेविषयक मदत आणि सल्ला देणे.
३. बंदींकरिता न्यायालयामध्ये विविध अर्ज लिहिणे.
४. बंदींच्या कुटुंबाला भेटणे, त्यांच्या अडचणी समजून घेणे इ.
५. कारागृहातील अधिकारी, जिल्हा· कायदा सेवा अधिकार आणि कारागृहीन बंदी यांच्याबरोबर संगनमत करणे.

कारागृह कार्यकर्त्यावर कामाचा भार जास्त असल्याने सुटलेल्या व्यक्तींचा पाठपुरावा करणे शक्य होत नाही. त्याकरिता आम्ही एक नवीन कार्यकर्ती खास ह्या कामाकरिता नेमली आहे. ती अशीलांच्या कुटुंबाकडे भेट देते. सुटलेल्या केसेस आणि न्यायालयातील केसेसचा पाठपुरावा करते.

▪ **महिला विभाग:**

महिला विभागात लोकरीच्या वस्तू बनविण्याचा उपक्रम चालू आहे. या उपक्रमाव्दारे जी महिला जास्त दिवसासाठी कारागृहात आहे त्यांना अर्थिक आणि मानसिकदृष्ट्या उपयुक्त ठरते. एक महिला तिच्या तीन मुलांच्या मृत्यूमुळे मानसिकरित्या पुष्कळ त्रासलेली होती, परंतु तिने उपक्रमातील वस्तू शिकणे आणि बनविण्यावर लक्ष केंद्रित केल्यामळे तिला मानसिक धक्क्यातून सावरायला मदत झाली.

▪ **पोलीस स्टेशन 'अ' विभाग:**

प्रयासने भरुच येथे 'अ' विभाग पोलीस स्टेशनमध्ये काम सुरु केले. कार्यकर्तीच्या इतर जबाबदारीमुळे आणि भरुच विभागातील प्रशासनामुळे 'अ' विभागात असणाऱ्या कार्यकर्तीला नियमित पोलीस स्टेशनला भेट देणे शक्य होत नाही. पोलीस स्टेशनचे सामाजिक कार्य जिल्हास्तरीय व्हावे असे प्रयासला वाटते. त्यामुळे सध्या प्रयासच्या वतीने पोलीस स्टेशन कार्याकरिता आठवडयातील दोन दिवस राखून ठेवण्यात आले आहेत.

▪ **अखेरीस.......**

यावर्षी भरुच विभागातील प्रगती खालीलप्रमाणे:

१. अंकलेश्वर उप—कारागृहात काम सुरु झाले.
२. अंकलेश्वर रेल्वे स्टेशनवर काम सुरु झाले.
३. कसिया गावातील कार्य थोडया काळाकरिता थांबलेले असले तरी प्रयासच्या कार्यकर्त्यांच्या पाठपुराव्यामुळे तेथील ९ युवकांना जगाडिया इंडस्ट्रियल इस्टेट येथे पेप्सीको इंडियामध्ये नोकरीसाठी पाठविण्यात आले.
४. प्रयासच्या कार्यकर्त्यांनी देणगी करिता अंकलेश्वर औद्योगिक विभागात आणि स्थानिक रहिवाश्यांपर्यंत संपर्क केला.
५. अशीलांच्या कुटुंबांकडे, कोर्ट आणि सुटलेल्या बंदी यांकडे पाठपुरावा भेटी करण्याकरिता एक नवीन कार्यकर्ती नेमण्यात आली.

# ११. धोरणात्मक कार्य

❖ प्रगती:

▪ **अनैतिक व्यापार प्रतिबंधक कायद्यासंबंधी राष्ट्रीय कार्यशाळा:**

राष्ट्रीय मानव अधिकार आयोग आणि प्रयास यांच्या संयुक्त विद्यमाने दोन दिवसाचे चर्चासत्र आयोजित केले होते. सदर चर्चासत्रामध्ये प्रामुख्याने वेश्यावृत्तीकरिता मुली व महिलांचे अनैतिक व्यापार सदंर्भातील कायदे आणि धोरणे यांचा मागोवा (पुर्नपाहणी) घेवून मुलीची सोडवणूक आणि सोडवणुकीनंतरचे पुनर्वसन धोरणे यांची परिणामकारक अंमलबजावणी यावर अधिक भर देण्यात आला. ही कार्यशाळा मुंबईत दिनांक २७ आणि २८ फेब्रुवारी २००४ रोजी आयोजित केली होती.

या राष्ट्रीय कार्यशाळेचे उद्‌घाटन न्यायमूती डॉ. ए.एस. आनंद, अध्यक्ष–राष्ट्रीय मानव अधिकार आयोग यांच्या शुभहस्ते झाले. या कार्यशाळेसाठी न्यायमूर्ती श्रीमती सुजाता मनोहर, सदस्य–रा.मा.अ.आ., न्यायमूर्ती श्री सी.एस. धर्माधिकारी (निवृत्त), श्रीमती कस्तुरी गुप्ता मेनन, सचिव–महिला व बालकल्याण विकास विभाग, भारत सरकार, श्रीमती विणा राव, सहसचिव– महिला व बालकल्याण विकास विभाग, भारत सरकार, श्री एस.एस. डोड, प्रमुख सचिव, महिला व बालकल्याण विकास विभाग, महाराष्ट्र शासन, प्राध्यापक श्रीमती उषा नायर, उप संचालिका–टाटा सामाजिक विज्ञान संस्थान यांनी चर्चासत्राच्या प्रारंभी उद्‌घाटनपर मार्गदर्शन केले. न्यायमूर्ती सुजाता मनोहर, श्रीमती कस्तुरी गुप्ता मेनन, आणि श्रीमती राव यांनी दोनही दिवस चर्चासत्राकरिता हजर राहून चर्चासत्राला अमूल्या असे मागदर्शन केले.

आंध्रप्रदेश, बिहार, गोवा, कर्नाटक, महाराष्ट्र, मेघालय, ओरिसा, तामिळनाडू, उत्तर प्रदेश, पश्चिम बंगाल आणि दिल्ली येथील न्यायव्यवस्थेतील अधिकारी, महिला बालकल्याण विभागातील राज्य व केंद्र सरकारमधील अधिकारी आणि पदाधिकारी स्वयंसेवी संस्था संघटनांतील कार्यकर्ते, वकील, अभ्यासक, या कार्यशाळेकरिता उपस्थित राहिले व त्यांनी आपले बहुमोल अभ्यास व अनुभव परस्परांबरोबर चर्चा करुन विषयाला मार्गस्थ करण्यात साहाय्य केले.

**या कार्यशाळेचे प्रमुख उद्दिष्टे:**

१. बालन्याय अधिनियम कायदा, भारतीय दंड संहिता, अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा व इतर विविध फायदे यांची मुली आणि महिलांची सोडवणूक व पुनर्वसन प्रक्रियेतील परिणामकारकता याची पुर्नपाहणी करणे. अंमलबजावणी व परिणाम व त्यात येणाऱ्या अडचणी तपासून पाहणे.
२. पुनर्वसन आणि मुलींची सोडवणूक संदर्भातील विविध व्यक्ती, संस्था आणि शासकीय विभाग यांच्यामध्ये अनुभवाची देवाणघेवाण करणे.

३. मुली आणि महिलांची सोडवणूक आणि पुनर्वसन प्रक्रियेत कायद्याच्या अंमलबजावणीत सरकारी यंत्रणेला येणाऱ्या अडचणी समजून घेऊन त्यावर मार्ग शोधणे.
४. मुली व महिलांच्या सोडवणूक आणि पुनर्वसन प्रक्रियेत येणाऱ्या विविध योजना आणि धोरणांचा पुर्नवालोकन करणे.

श्रीमती कस्तुरी गुप्ता मेनन, सचिव—महिला बालकल्याण विभाग, भारत सरकार यांनी महिलांकरिता नवीन योजना बनविली असून तिचा लाभ घेण्यासंदर्भात उपस्थितांना मार्गदर्शन केले. त्यात स्वयंसेवी संस्थांनी पुढाकार घेण्याबाबत त्यांनी विनंती केली. या सोडवणूक, आणि मुली/महिलांना घरी परत पाठविण्याच्या प्रक्रियेत येणारा खर्च महिला बालकल्याण विभाग करील असे त्यांनी आश्वासन दिले. तसेच घर सोडून रस्त्यावर येणाऱ्या मुली, लैंगिक छळ किंवा गुन्ह्यामध्ये बाधित, वेश्यावृत्तीमधून पळून किंवा सोडवून आलेल्या मुली ज्यांना घरी परत पाठविणे शक्य नाही किंवा परिवाराने नाकारलेल्या मुलींच्या पुनर्वसनाकरिता 'स्वाधार' ही नवीन योजना राबविण्यात येत असल्याचे त्यांनी सांगितले. या योजनेअंतर्गत निवासी व्यवस्था, वैद्यकीय मदत, समुपदेशन, कायदेविषयक मदत, व्यवसाय प्रशिक्षण आणि एक दूरध्वनीव्दारेसहायता सेवा असे विविध पैलू या योजनेमध्ये अंतर्भूत आहेत.

श्रीमती कस्तुरी गुप्ता मेनन म्हणाल्या की सरकारी यंत्रणा आणि स्वयंसेवी संस्था संघटना यांच्यामध्ये समन्वयाने कार्य सुरु झाले तर समाजामध्ये या बळी पडणाऱ्या महिलांबाबत सामाजिक, राजकीय असे वातावरण निर्माण होऊन या महिलांचे पुनर्वसन समाजामधील पुर्नमिलन होऊन त्यांच्या मूलभूत मानवाधिकाराचे सन्माननीय पालन होईल.

दोन दिवसाच्या या खुल्या व अर्थपूर्ण चर्चेमध्ये सर्व सदस्यांनी आपापले अनुभव आणि निरीक्षणे नोंदविली अंतत: त्यातून पुढील विषयानुसार महत्वाच्या सूचना मांडण्यात आल्या आहेत.
१. अनैतिक व्यापारामध्ये क्रियाशील व्यक्तीचे (दलाल) राष्ट्रीय पातळीवर माहिती संकलन करुन ते सर्वत्र उपलब्ध केल्यास या व्यापाराचा केंद्र बिंदुच नष्ट करणे शक्य होईल.
२. राष्ट्रीय तसेच राज्य पातळीवर (जिल्हा) विशेष कृती दलाची स्थापना करुन — अनैतिक व्यापार रोखणे. त्यात अडकणाऱ्या व्यक्तीची सुटका करणे त्या व्यक्तीचे समाजामध्ये यथोचित पुनर्वसन— पुर्न:निर्माण करणे, तत्परतेने व परिणामकारकरित्या शक्य होईल.
३. या विषयाशी संबंधित परिणाम करणाऱ्या सरकारच्या यंत्रणा, विविध खाते — अधिकारी व स्वयंसेवी संस्था यांच्यामध्ये सुसुत्रता आणि समन्वय नसल्याची खंत सर्वच पातळीवर सर्वांनी एकमुखाने मान्य केली व ती अतिशय काळजीची बाब असल्याचे निदर्शनास आले.

अनैतिक व्यापार प्रतिबंध कायद्याचे कलम ७ आणि ८ काढून टाकावे का? यावर सविस्तर वाद आणि चर्चा करण्यात आली. काहींच्या म्हणण्यानुसार या कलमामुळे बळी पडलेल्या महिलांचे गुन्हेगारीकरण होईल असे वाटते. तर काही लोकांच्या मते या दोन कलमांचा योग्य वापर झाल्यास कुंटनखाना चालक, ग्राहक आणि मुलींची वाहतूक करणारे दलाल यांच्यावर कारवाई होऊ शकते. या कलमांअंतर्गत ताब्यात घेतलेल्या मुलींच्या व महिलांच्या पुनर्वसनाच्या दृष्टीने ही कलमे उपयुक्त ठरु शकतात. त्यामुळे या कायद्याच्या कलमांमध्ये फेरबदल करण्यापूर्वी या चर्चा सत्रातून सुचविलेल्या शिफारशींचा विचार करुन बदल करण्यात यावा.

- **भायखळा जिल्हा कारागृहातील महिला कैद्यांच्या परिस्थितीबाबत जनहित याचिका:**

नोव्हेंबर २००३ मध्ये पिपल्स युनियन फॉर सिव्हिल लिबर्टिज या संस्थेने भायखळा कारागृहातील महिला बंदींना जाणवणाऱ्या पाण्याच्या तुटवडया विषयी न्यायालयात जनहित याचिका दाखल केली होती. सदर याचिकेची व्याप्ती वाढवून – आरोग्य, स्वच्छता, बालकल्याण, न्यायालयात नेण्या–आणण्याकरिता लागणारा पोलीस बंदोबस्त इत्यादी. मुंबई उच्च न्यायालयाने आयुक्त दिपा चव्हाण–पिकले यांना याविषयी माहिती संपादन करुन श्रीमती मा. मुख्य न्यायमूर्ती सी.के. ठक्कर यांच्या खंडपीठापुढे सादर करण्याचे आदेश दिले होते.

आयुक्तांनी सादर केलेल्या समस्यांबाबत उपाय शोधण्याकरिता न्यायालयाने एक समिती गठित केली होती. समिती सदस्य म्हणून प्रयासला निमंत्रित करण्यात आले होते. समितीने संबंधित विषयास अनुसरुन सविस्तर विचार करुन आपला अहवाल दोन भागांमध्ये न्यायालयास सादर केला आहे. या सूचनांमध्ये बालवाडी व साक्षरता शिक्षिकेची नियुक्ती करणे, महिला कैद्यांकरिता कल्याण अधिकारी, महिला कारागृहामध्ये महिला कर्मचाऱ्यांची नियुक्ती करणे, पोलीस दलामध्ये बंदींना कारागृह आणि न्यायालयादरम्यान ने–आण करण्याकरिता विशेष पोलीसांची नियुक्ती करावी. महिला वैद्यकीय अधिकाऱ्यांची बदली करुन तिच्याऐवजी दुसऱ्या महिला वैद्यकीय अधिकाऱ्याची नियुक्ती करणे. तसेच, विशेष स्त्रीरोगतज्ञ, मानसोपचारतज्ञ, त्वचारोगतज्ञ, बालरोगतज्ञ अशा वैद्यकीय अधिकाऱ्यांची प्रत्येक वारी आमंत्रित (मानसेवी) वैद्यकीय अधिकारी म्हणून नियुक्ती करणे. तसेच लहान मुले स्तनदा माता, गरोदर महिला यांच्या आहारामध्ये बदल सुचविणे आणि वैयक्तिक स्वच्छतेसाठी महिलांना साबण, तेल इत्यादी वस्तुंचा पुरवठा करणे. इत्यादी सूचना प्रयासच्या वतीने मांडण्यात आल्या.

महाराष्ट्र शासनाने उपरोक्त सूचना मान्य करुन अंमलबजावणीकरिता वेळ मागितला असून तसे प्रतिज्ञापत्र न्यायालयात सादर केले आहे.

- **कारागृहात कार्यकरणाऱ्या स्वयंसेवी संस्थांची बैठक:**

मंत्रालय, मुंबई येथे आंतरविभागीय बैठकीत झालेल्या ठरावानुसार कारागृह विभागाच्या सचिवांच्या अध्यक्षतेखाली महाराष्ट्रातील कारागृहामध्ये कार्य करणाऱ्या विविध स्वयंसेवी संस्थाची एक बैठक पुणे येथे बोलविण्यात आली. सदर बैठकीत महाराष्ट्रातून १७ स्वयंसेवी संस्था उपस्थित होत्या. या बैठकीत कायदेविषयक सहायता, महिला बंदी, बंदींची मुले, व्यवसाय प्रशिक्षण आणि पुनर्वसन आदी विषयांवर चर्चा करण्यात आली. अशा स्वरुपाच्या बैठका दर सहा महिन्यातून एकदा घ्याव्यात जेणेकरुन विविध संकल्पनाची अनुभवांची देवाणघेवाण व्हावी त्यातून विषयोचित मुद्यांवर समविचारी लोकांनी मिळून पाठपुरावा करावा. तसेच गट संघटित करुन प्रयासने त्याचे नेतृत्व करावे.

- महिला बंदींबाबत राष्ट्रीय चर्चासत्र

इंडियन सोसायटी ऑफ क्रिमीनॉलॉजी आणि क्रिमीनॉलॉजी डिपार्टमेंट ऑफ मद्रास विद्यापीठ यांच्या संयुक्त विद्यमाने महिला बंदी या विषयावर राष्ट्रीय पातळीवरील चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते. सदर चर्चासत्रातील सत्रांचे सूत्रसंचालन करण्याकरिता प्रयास संस्थेस निमंत्रित करण्यात आले होते. या कार्यशाळेमध्ये पोलीस अधिकारी, परिविक्षा अधिकारी, न्यायालयीन अधिकारी, संरक्षण गृह, कारागृह कर्मचारी, वकील, सरकारी वकील, माध्यमे आणि स्वयंसेवी संस्थेच प्रतिनिधी, विद्यार्थी असे लोक उपस्थित होते. मद्रास विद्यापीठाच्या गुन्हेशास्त्र विभागाबरोबर न्यायव्यवस्थेतील संबंधित विषयावर समन्वयाने कार्य करण्याबाबत एकमत झाले.

- कार्यशाळा आणि प्रशिक्षण कार्यक्रमातील प्रयासचा सहभाग

राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर कायदे, न्यायव्यवस्था, प्रशासन आणि पुनर्वसन, महिला व बाल आणि युवकांच्या प्रशिक्षण संस्था, कारागृह, पोलीस, महिला बालविकास विभाग, यांच्यामार्फत प्रयास कार्यकर्त्यांना कार्यशाळा, प्रशिक्षण कार्यक्रमात वारंवार बोलविण्यात येते. पुणे येथील तुरुंगाधिकारी प्रशिक्षण महाविद्यालयाबरोबर कैद्यांच्या पुनर्वसन विषयावर आधारित प्रशिक्षण कार्यक्रमाची रचना करण्याचे प्रयत्न सुरु आहेत. विविध समाजकार्य पदवी आणी पदव्युत्तर महाविद्यालयात व्याख्यानाकरिता बोलविण्यात येते. विद्यार्थी क्षेत्रीय कार्य अनुभवाकरिता संस्थेमध्ये नियमित येत असतात.

- शासकीय निधी संकलन

महिला आणि बालविकास विभागातील विविध योजनांतर्गत प्रयास करीत असलेल्या कार्याकरिता शासकीय योजनांतर्गत निधी मिळविणेकरिता प्रयत्न सुरु आहे. भारत सरकारकडून (महिला बालविकास विभागामधून मानवसंसाधन विभागांतर्गत) प्रयासने एक अर्ज पाठविला आहे. त्यास महाराष्ट्र शासनाने मान्यता दिली आहे. सदर प्रस्तावास यावर्षी मान्यता मिळेल अशी आशा वाटते.

❖ आव्हाने

- **वेश्याव्यवसाय कायदेशीर का करु नये?**

शासकीय तसेच शासनाबाहेरील बहुतांशी गट वेश्याव्यवसायास कायदेशीर करण्याबाबत वारंवार पाऊले उचलित असतात. त्यामुळे महिला व बालकांच्या अनैतिक वाहतुकीस अवैध प्रोत्साहन मिळेल. त्याचप्रमाणे या व्यवसायात आणल्या गेलेल्या महिलांवरील अत्याचाराचे प्रमाण अधिक प्रमाणात वाढेल. कायदेशीर कवच असल्यामुळे पोलीस देखील अशा तक्रारींकडे दुर्लक्ष करतील. परमिट राजच्या दहशतीमुळे आणि महिला बालकांकरिता पुनर्वसन योजनांच्या अभावामुळे बाहेर पडणाऱ्या महिलांसाठीच्या संधीदेखील संपुष्टात येतील.

वेश्याव्यवसाय कायदेशीर करण्याविरोधात प्रयास राज्य आणि राष्ट्रीय पातळीवर कार्य करणाऱ्या संस्थांच्या समन्वयाने पावले उचलीत आहे. तसेच सरकारबरोबर कार्य करुन काही समविचारी अधिकाऱ्यांच्या मदतीने या प्रक्रियेत पुढे जात आहे. सदर उद्दिष्टाचा एक भाग म्हणून अनैतिक व्यापार प्रतिबंध कायदा आणि इतर संबंधित कायद्यांच्या अंमलबजावणीबाबत एक राष्ट्रीय कार्यशाळा करण्यात आली.

- **न्यायाधिन बंदींच्या दुर्लक्षित समस्या**

न्यायालयीन बंदींच्या सद्य:स्थिती अतिशय दयनिय असून समस्यांच्या वाढत्या व्याप्तीमुळे व न्याय व्यवस्थेच्या दुर्लक्षामुळे निर्माण झाली आहे असे दिसून येते. उदा. बंदींना ठेवण्याकरिता अपुरी जागा, गर्दीमुळे आरोग्यविषयक समस्या न्यायालयात तारखेला ने–आण करण्याकरिता अपुरी पोलीस संरक्षण व्यवस्था, जामिन करण्याबाबतची असमर्थता, केस सुरु होण्यामध्ये मोठया संख्येमुळे होणारा ताण व उशीर, कायदेविषयक मदतीचा अभाव, कारागृहात असताना शैक्षणिक, मनोरंजनात्मक आणि व्यवसायाभिमुख कार्यक्रमाचा अभाव या सर्व समस्याबाबत कोणतीही एक संस्था कार्य करु शकत नाही. यावर यशस्वी मार्ग काढण्याकरिता संयुक्तपणे केलेले प्रयत्न आणि राजकीय इच्छाशक्ती असणे आवश्यक आहे. शेवटच्या स्तरामधील न्यायव्यवस्थेच्या अंमलदारांच्या कार्यपध्दती व अडचणी विचारात घेणे आवश्यक आहे. प्रयासने कार्यक्षेत्रातील अधिकारी वृदांबरोबर समन्वयाने प्रयत्न सुरु केले आहेत परंतु इच्छाशक्तीच्या अभावामुळे या पुनर्रचनेच्या उद्दिष्टाबाबत निराशाजनक प्रतिसाद मिळतो.

- **पुनर्वसन कायदा आणि धोरणाचा अभाव**

गुन्हेगारी व वेश्याव्यवसाय असणाऱ्या लोकांचे तसेच त्यांच्या मुलांच्या पुनर्वसन प्रक्रियेत याबाबत योग्य कायदा व धोरण नसल्यामुळे अनेक अडचणी येतात. स्वयंसेवी संस्था न्यायव्यवस्था आणि प्रसिध्दी माध्यमांच्या प्रभावामुळे काही विकासात्मक बदल घडून येत आहेत. परंतु शासनाच्या सरधोपट धोरणामुळे तात्पुरती मलमपट्टी करुन मुख्य समस्येकडे दुर्लक्षच करण्यात येत आहे. त्यामुळे तात्पुरता उपाय सापडतो परंतु कायमस्वरुपी तोडगा निघत नाही त्याकरिता सातत्यपूर्ण प्रयत्न केले जात नाहीत हे निराशाजनक आहे. त्यामुळे संबंधित संरचनेमध्ये बदल होतो परंतु व्यवस्थेला पर्यायी

व्यवस्थाच उभी राहते. परंतु ती फलदायी व कायमस्वरुपी नसते. त्यामुळे समस्या एका सरकारी खात्यातून दुसऱ्या खात्याकडे ढकलली जाते त्याची पूर्ण जबाबदारी कोणीही घेत नाही. यामध्ये शासकीय खात्यांमध्येच समन्वयाचा अभाव असल्याचे दिसून येते. वरील सर्व चित्र लक्षात घेता विविध खात्याच्या अधिकाऱ्यांना समन्वयित धोरण व कार्यक्रम आखण्याकरिता एकत्र आणणे मोठे अवघड काम आहे.

- **दबाव गटाचा अभाव**

न्यायाधीन बंदी किंवा वेश्यावृत्तीमधून निघणारी न्यायव्यवस्थेच्या चक्रात अडकलेल्या व्यक्तीबाबत सर्वसाधारण समाजात जाणिव जागृती झालेली नाही त्याला भेडसावणाऱ्या समस्या कोणत्या घटनेला ती व्यक्ती बळी पडलेली असेल पुढे त्या व्यक्तीच्या पुनर्वसनाबाबत निर्माण होणाऱ्या समस्या याबाबत जनमनात माहितीचा अभाव दिसून येतो. सदर व्यक्तीबाबत सातत्याने नकारात्मक सूर काढला जातो. सदर व्यक्ती मोठया प्रमाणावर विखुरलेल्या न्यायालय व पोलीसी दहशत यामुळे संघटित होताना दिसत नाही. या क्षेत्रात कार्यकरणाऱ्या संस्था संघटना अगदी मोजक्याच असून त्यांच्यामध्ये समन्वय दिसत नाही. त्यामुळे त्यांना शासन दरबारी योग्य मानमरातब मिळत नाही आणि त्यांचे प्रयत्न विखुरलेलेच राहतात ते नियोजनबध्द योजनेचा भाग बनत नाहीत. म्हणून अशा एका दबाव गटाची निर्मिती होणे आवश्यक आहे.